Received 12th November 1904
Registered 40B of 1904/5

खाशाची आहुती

अथवा

नरवीर सदाशिव-नाटक.

(एक शोकपर्यवसायि ऐतिहासिक नाटक.)

अंक १ ते ५.

हें पुस्तक

गोविंद आप्पाजी गुप्ते.

यानीं लिहिलें

तें

मुंबई येथें " शारदाक्रीडन " छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

बोल बोलतां वाटे सोपें । करणी करितां टीर कांपे ॥ १ ॥
तुकाराम.

किंमत १० आणे.

सन १९०४.

नाटकांतील पात्रें.

बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब	पेशवे.
सदाशिवराव ऊर्फ भाऊसाहेब रघुनाथराव ऊर्फ दादासाहेब	पेशव्यांचे बंधू.
विश्वासराव	पेशव्यांचा मुलगा.
समशेरबहाद्दूर, विठ्ठल शिवदेव विंचूरकर, इब्राहिमखान गारदी, जनकोजी, महादजी, मल्हारराव, बळवंतराव	पेशव्यांचे सरदार.
सुरजमल्ल	भरतपूरचा जाट.
बाळासाहेब	गोविंदपंत बुंदेल्याचा मुलगा.
अहमदशहा अबदल्ली	रोहिला.
सुजाउद्दौला, मनसूरअल्ली, रहिमतखान, रसूलखान	रोहिले सरदार.
काशिराज	रोहिल्याचा वकील.
[illegible]ता गुजर	रोहिल्याचा हेर.
[illegible]ार्वतीबाई	सदाशिवरावाची स्त्री.
लक्ष्मीबाई	बळवंतरावाची स्त्री.
सरस्वतीबाई	बुंदेल्याची स्त्री.

ब्राह्मण, चाकर, शिपाई वगैरे.

हें पुस्तक
कैलासवासी चिरंजीव सिताराम गोविंद गुप्ते
याच्या पुत्रप्रेम स्मरणार्थ वाचकांस
अर्पण केलें आहे.

प्रस्तावना.

बुधवार तारीख ८ इ. सन १७६१ रोजीं पानिपत येथें मराठे व मुसलमान यांच्यामधें जो घोर रणसंग्राम झाला त्याच्यासंबंधीं पुष्कळ ठिकाणीं निरनिराळी माहिती मिळते. ती अलीकडे कादंबरी, नाटकें व काव्यें या रूपानें प्रसिद्ध होत आहे. मला साधारण इतिहास वाचण्याचा जास्त नाद असल्याकारणानें व प्रस्तुतचाच प्रसंग जरा चटकदार वाटल्यावरून मी हें नाटक लिहिलें आहे.

हें पुस्तक लिहिण्यास घेतल्यापासून मजवर बरींच संकटें आलीं. त्यांतून ईशकृपेनें पार पडल्यामुळें हें आज मी आपल्या वाचकांस सादर करीत आहें. माझा अशा प्रकारचा हा पहिलाच प्रसंग असल्याकारणानें त्यांत भाषादोष, हस्तदोष वगैरे पुष्कळ असतील, ते सूज्ञवाचकांनीं हंसक्षीर या न्यायानें मानून घ्यावे; व त्या सर्वांबद्दल मला माफी करून या पुस्तकास योग्य मदत करावी.

हें पुस्तक लिहितांना मीं खालील पुस्तकांचा उपयोग केला आहे. त्याबद्दल त्या ग्रंथकर्त्यांचा मी फार फार आभारी आहें. "पेशव्यांची बखर," "थोरले मल्हारराव होळकरांचें चरित्र," "ए. मॅकडोनल्ड साहेबांनीं नानाफडणवीसांचें लिहीलेलें चरित्र," "मराठ्यांच्या इतिहासांचीं साधनें" वगैरे.

ह्या पुस्तकाची हस्तलिखित प्रत माझे स्नेही राजमान्य राजश्री **सदाशिव गणेश प्रधान**, संगित "सुनिश्चयप्रभाव" नाटकाचे कर्ते यांनीं तपासून व वेळोवेळीं ज्या योग्य सूचना दिल्या त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहें.

हें पुस्तक लिहीत असतांना माझ्या बऱ्याच स्नेहांनीं मला विचारलें कीं ह्या युद्धप्रसंगीं चांद्रसेनीय कायस्थ प्रभु-मंडळी होती काय ? तर त्यांस माझें असें सांगणें आहे कीं, पानिपतच्या लढाईंत ह्या मंडळींपैकीं फक्त महिपतराव आवजी नांवाचा एक सरदार होता. भाऊसाहेबांच्या कैफियतींत बाजी हरी म्हणून एक नांव येतें तें कोणा तरी चांद्रसेनीय कायस्थ प्रभू सरदाराचें असावें असें रा. रा. राजवाडे यांचें म्हणणें आहे. ह्यावेळीं चांद्रसेनीय कायस्थप्रभूमंडळी नागपूरच्या दरबारांत विशेष होती. परंतु जानोजी व मुधोजी भोंसले यांच्यापैकीं पानिपतास कोणीच गेला नाहीं. तेव्हां त्यांच्या पदरचीही कायस्थ मंडळी कोणी गेली नाहीं. (मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें पान ३२९) शिवाय ही मंडळी रघुनाथरावाच्या बाजूची असल्याकारणानें रघुनाथरावाबरोबर पुण्यासच राहिली होती.

माटुंगा
सप्तेंबर १९०४ } **गोविंद आप्पाजी गुप्ते.**

खाशाची आहुती

अथवा

नरवीर सदाशिव-नाटक.

अंक १ ला-प्रवेश १ ला.

स्थळ—(उद्गीर येथीलसदाशिवरावभाऊच्या छावणी समोरील रस्ता.)

सदाशिवराव-(आपल्याशींच) जगामध्यें, प्रत्येक प्राण्याला महत्वाकांक्षा ही आहे. पण या महत्वाकांक्षेला कांहींच का मर्यादा असूं नये ! माझे वडील चिमणाजीआप्पा, आणि चुलते बाजीराव साहेब पेशवे, या दोवांच्या शूरत्वासंबंधानें एक अधिक शूर आणि एक कमी शूर. एक साधारण मुत्सदी आणि दुसरा राजकार्य धुरंधर, असें जगांत कोणालाही बोलतां आलें नाहीं. दैवाची गोष्ट निराळी! आजोबाचे पश्चात् पेशवाईचीं वस्त्रें बाजीराव साहेब माझे वडील चुलते असल्याकारणानें त्यांनाच मिळणें योग्य, आणि तीं तशीं मिळालीं, ह्मणून माझ्या बापाची योग्यता कमी असें होत नाहीं. त्या उभयतां बंधूनीं सारखेपणानें वागून स्वामीकार्य आणि देशकार्य केलें. आमचे बंधू रघुनाथरावदादा शूर आहेत. त्याचप्रमाणें ज्या चिमणाजीआप्पानीं आपलें शौर्य विलक्षण तऱ्हेनें गाजवून मोठ्या मुत्सद्दीपणानें विलक्षण युक्त्या लढवून,

मोठ्या धैर्यानें लढून, वसईचा प्रचंड किल्ला फिरंग्यापासून हिसकावून घेतला त्याच आप्पासाहेबांचा मुलगा मी, माझ्या ठिकाणीं माझ्या बापाप्रमाणेंच शौर्य आहे. देशकार्य आणि स्वामिकार्य साधण्याची मलाही उत्कट इच्छा आहे. असें असतांना माझ्या चुलत बंधूची इच्छा माझा उत्कर्ष होऊं नये, अशा तऱ्हेची असावी हें पेशव्यांचें तर खरेंच, परंतु महाराष्ट्राचेंही दुर्दैव आहे, असें मला वाटतें. मला केव्हां तरी एकदां रणांगणीं समशेर गाजविण्याचा प्रसंग यावा ह्मणून मीं पुष्कळ प्रयत्न केले. परंतु आजदिनपर्यंत माझी इच्छा पूर्ण झाली नव्हती. ती या हल्लींच्या उदगीरच्या प्रसंगीं थोडीशी सफल झाली. तोंच दत्ताजी शिंद्याचा मृत्यू आणि मराठ्यांचा गिलच्यांच्या बरोबर युद्धांत झालेला पाडाव, या दोन गोष्टींमुळें मला अतीशय स्फुरण चढलें आहे. आतां पुण्यास जाऊन बंधूंची भेट घेऊं आणि गिलच्यांबरोबर लढण्याकरितां स्वारीवर मीच जाणार अशाबद्दल हर प्रयत्न करून बंधूंचें मन वळवितों; आणि मग घेतों मुसंड्यांचा समाचार. अरे मुसंड्यांनो ! आमच्या या आर्यभूमीमध्यें येऊन तुह्मीं फार बंडावा माजविला ! आमच्या देशबांधवांना, आमच्या प्रजाजनांना तुह्मीं त्राहीत्राही करून सोडलें आहे. आमच्या पूज्य आर्य धर्माला तुह्मीं अतिशय प्रतीबंध आणला आहांत; आमच्या लोकांना सक्तीनें विधर्मी करीत आहां ! पण लक्षांत ठेवा, आतां ह्या वीरपूत्र सदाशिवरावभाऊशीं

गांठ आहे. तुह्मां सर्वांचा धुवा उडवून ही आर्यभूमी निर्वैर, निष्कंटक करून टाकीन. आमच्या ह्या पवित्र भूमिमध्यें एकही मुसंडा जिवंत राहूं देणार नाहीं! आमच्या समर्थांचा भगवा झेंडा अटकेपर्यंत नेऊन तुमच्या उरावर नाचवीन! पुनः तुह्मांला या देशामध्यें पाऊल देखील टाकूं देणार नाहीं! तुह्मीं ज्या ठिकाणीं धुमाकूळ चालविली आहे ती पानिपतची रणभूमी ह्मणजे आमचे पूर्वज कौरवपांडवांच्या घनघोर युद्धाचें हें कुरुक्षेत्र होय. त्या ठिकाणीं ज्याप्रमाणें सज्जनांना पीडा देणारे कौरव, यांच्या आहुती पडल्या, आणि राजा धर्म यशस्वी झाला, त्या ठिकाणीं तुह्मां सर्वांच्या आहुती ह्या रणयज्ञांत देईन आणि बहुत दिवसांपासून रुधिर प्राशनाच्या आशेनें अत्यंत तृषित झालेली ती कुरुक्षेत्राची रणभूमि तुमच्या रक्ताच्या सिंचनानें शांत करीन! पेशव्यांचे गळ्यांतील केवळ ताईत! उजवा हात! फार तर काय पण केवळ दुसरा प्राणच, अशा त्या रणसिंह दत्ताजीच्या मरणानंतर त्याचें मस्तक लाथेनें तुडवून, तुह्मांपैकीं त्या अधम कुतुबशहानें त्याची विटंबना केली! त्या तुह्मां चांडाळांचा नायनाट करीन, तेव्हांच मला स्वस्थ झोंप येईल. चला, आतां दुसरा उद्योग नाहीं. पुण्यास निघण्याची तयारी केली पाहिजे. (दाराकडे पाहून) कोण आहेरे तिकडे? (चाकर येतो)

चाकर—(मुजरा करून) जी सरकार.

सदाशिवराव—अरे, बळवंतराव मेंहदळ्यांस जाऊन सांग कीं, स्नान आटोपल्यावर मला येऊन भेटा. काम फार जरूरीचें आहे. समजलास ?

चाकर—जी सरकार (जातो.)

सदाशिवराव–आपणही आतां स्नानास जावें. (जातो.)

प्रवेश–२

स्थळ–पुणेयेथील पेशव्यांचावाडा.

(नानासाहेब पेशवे, सदाशिवरावभाऊ, रघुनाथराव, विश्वासराव, व इतर सरदार बसले आहेत असा पडदा उघडतो.)

नानासा०–अहमदशहा दुराणी सारख्या मनुष्यानें शिंदे होळकरांचा पराभव केला, ही फार आश्चर्याची गोष्ट आहे! दत्ताजी शिंद्याचा मृत्यू ह्मणजे पेशव्यांची मोठीच हानी झाली! असो मर्जी ईश्वराची. ज्यांनीं राजकार्य आणि देश-सेवा या दोहोंचें जूं आपल्या मानेवर घेतलें, त्यांनीं हिंमत सोडणें कधींही योग्य होणार नाहीं.

सदाशिवराव—नानासाहेब, असे आपण चिंतातूर कां होतां ? गोमीस पाय पुष्कळ असतात, त्यांतील एखादा मोड-ला तर ती काय लंगडी होते ? एक दत्ताजी शिंदे मारले गेले ह्मणून आपण एवढें दिलगीर होण्याचें कारण नाहीं. दुराणीची बिशाद काय ? आपण इतके कशाला घाबरतां ?

समशेरबहादूर—नानासाहेब, रघुनाथराव नुकतेच तैमूरशहाचा पराभव करून, उत्तरहिंदुस्थानांतून आले आहेत. त्यांची ह्या मोहिमेवर नेमणूक केल्यास आपला

कार्यभाग साधेल. प्रस्तुत प्रसंगीं रघुनाथरावाचीच नेमणूक योग्य आहे.

सदाशिवराव–(जरा टोंचून) रघुनाथरावाची नेमणूक तर योग्य आहे. पण–

नानासा०—भाऊ, पण काय ?

सदाशिवराव–तैमूरशहाचा पराभव केला त्यांत काय मिळविलें ? कर्जच करून आले ना ? मग त्यांत ज्यास्त काय केलें ?

रघुनाथराव—भाऊसाहेब, मनुष्य अनुभवानें शहाणा होतो. स्वारीच्या कामीं कित्येक वेळां किफायत होते व कित्येक वेळां नुकसान होतें त्यांत या स्वारीमध्यें फौज फार ठेवावी लागली त्यामुळें कर्ज झालें. आह्मीं कपट करून मिळकत न दाखवितां कर्ज मात्र दाखवितों असा तुमचा समज झाला आहे काय ?

समशेरबहादूर—दादासाहेब, आपल्यासारख्या सूज्ञ मनुष्यांनीं असें रागावतां कामा नये. लढाईच्या गोष्टी फार विचाराच्या आहेत. त्यांचा विचारही पोक्तपणानेंच झाला पाहिजे.

नानासा०—दादा, तुह्मीं असें रागावतां ह्यांत अर्थ काय ? भाऊनीं जें खरें होतें तें सांगितलें.

रघुनाथराव—मीं लूट कांहीं आणली नाहीं, हें तर स्पष्ट दिसतेंच आहे. मग त्यांत आणखी टोंचून बोलण्याचें काय प्रयोजन ?

नानासा०—तें कांहीं असो, पण आतां पुढचा विचार केला पाहिजे.

सदाशिवराव—नानासाहेब, रघुनाथरावाबरोबर साठ हजार फौज देऊन त्यांना हिंदुस्थानांत जाऊं द्यावें, व मागाहून त्यांस लागल्यास मदत पाठवावी.

नानासा०—भाऊ, आपणांपैकीं कोणीही एकजण या मोहिमेवर गेला तर आब उडून जाईल. याकरितां तिघांनींही येथें राहून हिंदुस्थानांत फक्त सडी फौज रवाना करावी.

सदाशिवराव—नानासाहेब, दुराणी ह्मणजे साधा शत्रू नाहीं. नुसत्या फौजेच्या हातून कार्य होणार नाहीं. खाशांपैकींच कोणी गेला पाहिजे. नानासाहेब, आपण सारीं कृत्यें करितों तीं कीर्तिकरितां. आणि अशावेळीं आपण येथें रहावें हें चांगलें नाहीं. मरण यावयाचें असेल तर तें स्वदेशीं किंवा परदेशीं टळणार नाहीं.

नानासा०—दादा, तुह्मी हिंदुस्थानांतील मोहिमेवर जातां का ?

रघुनाथराव—आपली जर आज्ञा असेल तर मला जाणें भाग आहे. पण ऐशीहजार फौज व १ कोट रुपयांची खर्चाची मंजुरी असेल तर जाईन. मग आह्मीं व दुराणी पाहून घेऊं. हें जर आपणांस पसंत नसेल तर माझी जाण्याची इच्छा नाहीं.

सदाशिवराव—दादा, एवढ्या मोठ्या रकमेची जरूर आहे असें मला वाटत नाहीं. दुराणी हा एक तुह्मांला बाऊ

वाटत आहे. पण दुराणीची चिशाद काय ! हं हं ह्मणतां त्याला अटकेच्या पार घालवून देऊं, आणि काशी, प्रयागादी तीर्थें करून, देवदर्शनें घेतघेत परत दक्षिणेंत येऊं. आमच्या बरोबर बायकांमुलांनाही अनायासें दर्शनें होतील. मात्र इब्राहिमखान आपल्या पलटणींसह माझ्याबरोबर असावेत, ह्मणजे या मोहिमेवर जाण्यास मी स्वतः तयार आहें. हुकूम मात्र व्हावा.

इब्राहिम—सरकार आप् जो कभी दुष्मन्‌को खबर न होते एकदम् छापा डालके लढनेका इरादा करते हैं तो फिर् मेरा बिलकुल् नाईलाज है. क्यौंके मेरे ताबेमें भारी तोफखाना और पैदल पटालना है. मुजको उन् सबों के साथ भगना बहोत् ही मुष्कील होगा.

सदाशिवराव—खानसाहेब, वेळ प्रसंग पडल्यास आह्मीं तुह्मांस सोडून जाणार नाहीं. तुह्मीं जेथें धैर्यानें ठांसून उभे रहाल तेथेंच आह्मीं राहूं.

इब्राहिम—तो फिर् मेरे तरफसे इन्‌कार नही है.

नानासा०—भाऊ, तुझी जर अशा तऱ्हेची उमेद आहे, तर मजकडून कांहीं हरकत नाहीं. वेळ प्रसंगीं कांहीं मदत लागल्यास आम्हांस लिहीत जा. हयगय करूं नको.

सदाशिवराव—नानासाहेब, इराणी म्हणजे कः पदार्थ आहे. त्याची काळजी आपण करूं नये. त्याला दातीं तृण धरून आपले पाशीं घेऊन येतों, तसा हातीं नाहींच लागला

तर ठार मारून त्याच्या फौजेचा चेंदा मेंदा करून टाकतों. आपण काळजी करूं नये.

रघुनाथराव–(आपल्याशीं) आतां हे तेथें जाऊन काय ध्वज लावतात ते पाहावें. उगीच फुशारकी मारण्यांत काय होशील. घोडामैदान जवळ आलें आहे. पाहूंया काय होतें तें.

विश्वासराव––नानासाहेब, भाऊकाका स्वारीवर जात आहेत, तर मी जाऊं का त्यांच्या बरोबर?

नानासा॰––बाळा विश्वासा, तूं अझून लहान आहेस. मोठा झालास म्हणजे हींच कामें करावयाचीं आहेत.

विश्वासराव—नानासाहेब, आपण म्हणतां तें खरें. पण घोड्यावर बसण्यास शिकलें नाहीं तर तें यावें कसें? नदी अगर सरोवराच्या पाण्याला स्पर्शही केला नाहीं तर कोणाला पोंहतां येईल काय? ह्या कला जशा शिकाव्या लागतात त्याचप्रमाणें युद्धकला ही सहवासानें आणि अनुभवानेंच येणार. सिंहाचे बच्चानें दरीमध्यें अक्षय्य राहणें शोभेल काय? तो जरी लहान असला तरी उन्मत्त हत्तीचें गंडस्थळ फोडण्याची स्वाभाविक प्रेरणा त्याच्या अंतःकरणांत असतेच. मग भाऊकाकाच्या बरोबर आपण मला कां जाऊं देत नाहीं? याचें कारण केवळ मोह! असें मला वाटतें.

सदाशिवराव–नानासाहेब, विश्वासरावाची जर इच्छा आहे तर येऊंद्या त्याला मजबरोबर. मी त्याला आपल्या जिवापलीकडे संभाळीन. तो सिंहाचा बच्चा आहे. त्याची

हालहवाल आपणास रोज सांडणी स्वारांबरोबर कळवीत जाईन. ज्या ठिकाणीं विश्वासरावाचें संरक्षण करण्याकरितां प्रत्यक्ष मी आहें, तेथें आपल्या इतकीच त्याची काळजी घेतली जाणार नाहीं, असें आपल्यास वाटत असेल, अशी माझी मनोदेवता मला सांगत नाहीं.

नानासा०—भाऊ, विश्वासाला बरोबर नेण्याचा तुझा पूर्ण मानस दिसतो आणि त्याची ही उत्कंठा आहे. माझ्या प्रमाणें तूं त्याचें संरक्षण करशील याबद्दल मुळींच शंका नाहीं. वीराच्या बच्यानें जन्मभर गादीवर लोळत पडावयाचें नाहीं. परंतु समरभूमिचें दर्शन योग्य वेळींच घेतलें पाहिजे इतकेंच माझें ह्मणणें आहे. त्यांतून बाळा विश्वासा, भाऊ, तुह्मीं दोघेही घरांतून अनुमोदन घ्या आणि ती जर पाठवीत असेल तर तुमच्या मर्जीप्रमाणें जाण्याची तयारी करा.

सदाशिवराव व विश्वासराव—ठीक आहे. तें काम आमच्याकडे.

नानासा०—चला आतां, बराच उशीर झाला आहे. (सर्व जातात.)

प्रवेश ३

स्थळ—पुणे येथील भांग्या मारुतीचें देऊळ

(सखारामभट, गोपालभट, अंतुभट, व विनायकभट येतात.)

सखारामभट—कायरे गोपाळभट, काल मोठ्या लगबगीनें वाड्यांत कशाला गेला होतास ? बेट्या, आह्मीं गांवांत

श्राद्धसंकल्प झोडून आपला गुजारा करतों, आणि तूं मात्र हरामखोरा वाड्यांत जेव्हां तेव्हां आपला लग्गा लावतोस. आह्मांला एक वेळेला सुद्धां आमंत्रण मिळत नाहीं. बरोबर-च आहे बाबा, श्रीमंतांच्या उपाध्यांचा तूं पडलास भाचा बरें आहे. मारुतीराय पाहून घेईल तुला. (तपकीर ओढतो)

अंतुभट—अहो सखारामभट, तुम्हांला ठाऊक नाहीं. हल्लीं थोरल्या बाईसाहेब नेहमीं सवाष्ण ब्राम्हण घालीत असतात. तेव्हां हा एकटाच जात नाहीं. म्हणून जात असतें, म्हणून! पण कायरे गोप्या, तूं आमचा लहानपणचा स्नेही आणि एखादे दिवशीं पण आमची व्यवस्था लावूं नये याची तुला शरम नाहीं वाटत ?

गोपाळभट--जरा थांबा. दोन चार दिवस तुम्हां सगळ्यांची अशी चंगळ उडवून देतों कीं तुम्हाला पण पक्वान्न खातां खातां नकोसें होऊन जाईल. श्रीमंत भाऊ-साहेब पेशवे उदगीरच्या लढाईवरून विजयी होऊन आले आहेत त्यासंबंधानें सहस्त्र भोजन व्हावयाचें आहे. आणि दक्षणा पण अशी तशी हलकी नाहीं. वाघाचा डोळा !

विनायकभट—पण कायरे गोपाळभट, वाड्यांत कांहीं हल्लीं स्वारीची वाटाघाट चालली आहे. उत्तर हिंदुस्थानांत दिल्लीकडे स्वारीवर खाशांच्यापैकीं कोणी जाणार म्हणून समजतें. तुला आहे का कांहीं त्याची खबर ?

गोपाळभट---अरे खबर म्हणजे काय पुसतोस ? स्वारीवर सदाशिवरावभाऊ आणि विश्वासराव असे दोघे खाशे जाण्याचें ठरलें.

सखारामभट—काय ? म्हणतोस काय गोप्या ? खरें कीं काय ? तर मग बेट्या हें सहस्र भोजन झाल्यानंतर, श्रीमंतांना उत्तर हिंदुस्थानच्या लढाईत यश यावें ह्मणून ब्राह्मण भोजन घालून, आशीर्वाद घेऊन, स्वारीवर श्रीमंतांनीं जावें असा कांहीं घाट उपाध्येबुवा कडून जुळवून आण ह्मणजे नुसती दक्षणा तर काय, पण आपणा सर्वांना एखाद दुसरें वस्त्रही मिळेल.

गोपाळभट–अरे माझ्या कडून होईल तितका प्रयत्न, करून पाहतों. बरें मी आतां वाड्यांत जातों. वेळ होत आलीच. मला अजून स्नान करावयाचें आहे.

विनायकभट—अरे, मग कपाळाला भस्म आणि गंध हें रे काय ?

अंतुभट–अरे या रांडच्यानीं धोंडभट्टी केली आहे वाटतें! बरें आतां बोलत बसण्यांत अर्थ नाहीं. मला ढमढेऱ्यांच्या बोळांत त्या साळुबाईच्या घरीं एकादशणीला जावयाचें आहे. आज कांहीं गांवांतील दुसरें आमंत्रण येईलसें दिसत नाहीं. बराच वेळ झाला. चला आतां जाऊं. (जातात.)

———

प्रवेश ४

स्थळ–पुणे बुधवारचा वाडा.

(सदाशिवराव—पलंगावर एकटेच बसले आहेत.)

सदाशिवराव—काय चमत्कार आहे ! ज्या वंशामध्यें आमचे रणबहादुर चुलते बाजीराव साहेब, वडील आप्पा साहेब, त्याच वंशांतील मी, नाना आणि दादा असे आह्मीं सगळेही पराक्रमी असतांना आमच्या वहिनी साहेबाचा हेतू मजविषयीं असा अं. ! इतका मत्सर माझ्या संबंधानें कां ? नानासाहेब विश्वासरावाला स्वारीवर पाठविण्या करितां केवळ माझ्या हेतूमुळें तयार झाले ! पण आमच्या वहिनी साहेबाची तऱ्हा कांहीं वेगळीच. त्यांना वाटत असेल कीं भाऊच्या हांतून कांहीं एक पराक्रम न होतां, दादा साहेबाप्रमाणें मीही कर्ज करून येईन, आणि कदाचित् तसें नसल्यास आपल्या मुलानें स्वारीवर न जातां आह्मीं एकट्यानेंच जाऊन मरावें ! अरे, पण अशी कुशंका कां ? विश्वासराव हा वीराचा बच्चा आहे. प्रत्यक्ष माझा पुतण्या, त्याच्या संबंधानें माझ्या मनांत कांहींच का प्रेम नाहीं ! किती हट्टी स्वभाव या बाईचा ! काय करावें ! आज ती अधिकारीण पडली. म्हणून मला बोलतां येत नाहीं. आज वहिनीच्या ठिकाणीं आई जर जिवंत असती, तर तिचा मी किती तरी धिःकार केला असता ! आमच्या वंशांतील प्रत्येक पूर्वजानें स्वामीकार्याकरितां रणांगणीं

आपले देह ठेविले. मग विश्वासरावानेंच शेणांतील किड्या-प्रमाणें घरांत कुजत पडावें, असें आमच्या वहिनी साहेबास कां वाटावें तें समजत नाहीं! मला काय ह्मणतात, भावोजी, तुह्मीं आपल्या वडिलांप्रमाणेंच शूर आहांत, त्यांच्या प्रमाणेंच शूरत्व गाजवून शत्रूचा नायनाट करा. आणि गादीची इभ्रत राखा. विश्वासरावास तुमच्या बरोबर पाठविण्याची माझी इच्छा नाहीं. स्वतः घरांतून जाणें झालें असतें तर मी त्याला पाठविलें असतें. किती हा अविश्वास? काय माझी ही अमर्यादा? थोर नशीब कीं त्या वेळेला नानासाहेबानीं थोडीशी माझी बाजू धरली! तेव्हां मोठ्या रागानें वहिनीसाहेब बोलल्या तुमची मर्जीच आहे, तर त्याला घेऊन जा, तो तुमचाच आहे. पण मनांत इतका सुद्धां विचार आला नाहीं कीं तो माझा नव्हे असें मी केव्हां ह्मटलें होतें. इतकेंच नव्हे पण मी त्याला माझ्या प्राणापेक्षांहि अधिक समजतों. नानाच्या पश्चात् पेशवा तोच होणार, मला त्याची किंमत कधींतरी कमी वाटेल काय! जाऊं द्या, बायकांचे मूर्खपणाचा विचारच करूं नाहीं; तरी पण वारंवार मनाला हें वाटतें कीं, आमच्या वहिनीसारखी कपटी, कुत्सीत स्वभावाची बायको विरळा सांपडेल. असो, परवांचे दिवशीं उजाडण्याच्यापूर्वीं आह्मीं उभयतांखाशे सर्व फौजेनिशीं रवाना होणार. हें तर आतां ठरलेंच, आणि माझ्या मनाप्रमाणें तूर्ततरी हा बेत खास सिद्धिस जाणार, ह्मणून आज मला समाधान वाटतें. आतां एक महत्वाची

गोष्ट ह्मटली ह्मणजे हीच कीं घरांतून अनुमोदन मिळालें पाहिजे. मी म्हणजे तिच्या संमतीवर अवलंबून राहणारच असें नव्हे. परंतु होईल तोंपर्यंत तिचें अंतःकरण दुखवूं नये अशी माझी मनापासून इच्छा आहे. (जरा थांबून) कोण आहे ग तिकडे, यमुने (यमुना दासी येते.)

यमुना—काय हुकूम, सरकार?

सदाशिवराव--तुझ्या बाईसाहेबाना जाऊन सांग, आज किंचित् माझें कपाळ दुखतें आहे. तुमचे घरांतील सर्व व्यवसाय आटोपले असल्यास, वहिनीची परवानगी घेऊन इकडे लवकर या.

(यमुना जाते व पार्वतीबाईसह येते.)

यमुना—सरकार, ह्या पहा बाईसाब आल्याच.

सदाशिवराव—बरें तर तूं जा. (यमुना जाते.)

पार्वतीबाई–कां,आज बोलावणें पाठविण्याची इतकी घाई कशा करतां झाली ? होय, पण मी चुकलेंच. आतां स्वारीवर जाण्याची तयारी चाललीच आहे. तेव्हां सर्व गोष्टीची घाईही असलीच पाहिजे. मग केव्हां निघायचं ठरलं ? मी जाऊं कां माहेरी ? आपण गेल्यावर आमच्या जाऊंबाईचा तोरा मला बाई कांहीं सहन व्हावयाचा नाहीं. मग केव्हां सकाळीं निघावयाचा बेत करूं कां ?

सदाशिवराव--हं ! अगदीं इतकी तयारी हं ! काय चमत्कार आहे, बायकांच्या स्वभावाची अगदीं कमाल आहे बुवा ! असो, पण आधीं बसा तर खऱ्या अशा.

(पार्वती पलंगावर बसते) काय म्हणणें आहे आपलें ? माहेरी जायाचं ? ठीक आहे, आमची कांहीं हरकत नाहीं. पण माहेरीं जायाचें एवढें कोणतें बलवत्तर कारण आहे ? इथं जर राहिलांत तर गोपिका वहिनी तुमचं काय करणार आहेत ? कदाचित् समजा कांहीं कमी जास्त बोलल्या तर त्या मुळें आपल्या आंगाला भोंकें कां पडणार आहेत ? अग, त्या वडिल आहेत. शिवाय गादीच्या मालकीण,तुझी जाऊ झाली म्हणून काय झालं ग, तिच्या पुढें तुला सुने प्रमाणेंच वागलें पाहिजे. आमच्या वहिनीचा स्वभाव थोडा कडक आहे पण ती बायको म्हणजे पेशवाईतील एक मुत्सदी आहे. या प्रसंगीं तूं माहेरीं जाणें म्हणजे आमच्या सारख्या मोठ्या घरामध्यें जावा जावांचें पटत नाहीं असें लोकांत उघड करून दाखविणें आहे. आणि अशा तऱ्हेचा मूर्खपणा निदान तूं तरी करावास, हें मला पसंत नाहीं. या उपर तुझी मर्जी असेल तर खुशाल जा.

पार्वतीबाई—बाईगबाई ! कुठें माहेरीं जातें एवढा एक शब्द तोंडांतून आला, त्याबरोबर हें कितीतरी अकांड तांडव करायचं ! माझ्या बोलण्यानें इतका राग यावयाला झालें तरी काय ? त्यांचीं बोलणीं आपल्याला सहन होत असतील, मला मात्र सहन होत नाहींत. विश्वासरावाला बरोबर न्यावयाचा असें जेव्हां बोलणें चाललें होतें, त्यावेळीं जरी मी तिथें नव्हतें, तरी आड उभें राहून सगळें ऐकलें आहे त्यांनीं आपली कितीशी किंमत ठेविली,

आणि त्यांत आश्चर्य ते कसलं प्रत्यक्ष नानाभावोजींची ज्यांच्याजवळ किंमत नाहीं, त्या बाई आपला कितपत मान ठेवणार ? आणि हा उपटुनसूळ खांद्यावर घ्यावयाची आपल्यालातरी काय जरूर होती ? मामंजींनी हाडाची काडं करून गादीला किती तरी मदत केली ! किती ठिकाणीं जय मिळविले, पण त्यांना कोणी पेशवाईची वस्त्रें दिली कां ? आणखी आपल्याला तरी मिळायचीं आहेतका ? ह्मणून ह्मणतें ही मेली उठाठेव पाहिजे आहे तरी कशाला ? स्वस्थ घरीं बसून राहिलं तर आपलं कोण काय करणार आहे ? घरांत चाकर नोकर थोडे का आहेत ! त्यांचं नाहीं का संगोपन होत आहे ? तसंच आपणां उभयतांचं होईल, ह्मणून ह्मणतें स्वस्थ घरीं बसून राहवं. स्वारीवर दादासाहेब गेले, तर त्यांत इकडे काय बिघडणार आहे ? जाऊं द्यावं गेले त्यानांच, आणि विश्वासरावाला ही पण पाठवूं नाहीं ह्मणून सांगावं.

सदाशीवराव—वाहवा ! आतांचा हा तुझा उपदेश ऐकून, मला असें वाटत आहे कीं, आप्पा जिवंत असून माझ्यासमोर उभे आहेत. आणि तेच मला आपल्या ब्रीदाप्रमाणें शूरत्व करण्याचा उपदेश करीत आहेत. खचित माझी इतकी कल्पना नव्हती कीं, तूं इतक्या पोक्त मनाची असशील ! तुला काय वाटतं कीं पेशव्यांचे गादीवर बसणारा जो पुरुष त्याच्याच माथीं सर्व राज्याचा भार असतो ? आह्मीं नानांचे कोणीच नव्हे का ? या महत्कार्याला नानांस

मी कांहीं मदत करूंनये असें वर्तन झाल्यास माझे चुलते बाजीरावसाहेब, वडील आप्पासाहेब, स्वर्गलोकीं माझी ही षंढकृती पाहून डोळ्यांतून आसवें गाळतील. तुह्मां बायकांना काय कळतें ? तुह्मीं स्त्रीया ह्मणजे मत्सराचें माहेर घर; तुह्मांला वैभवाची हौस असणें स्वाभाविक आहे. पण तें आह्मांला नको आहे. ज्यामध्यें आपल्या देशाचें कल्याण होईल आणि रणांगणीं कीर्ति मिळेल, तेंच आमचें कर्तव्य आणि त्याकरितांच आमचा जन्म! तुला वीरपत्नी ह्मणून घेण्याची जर इच्छा नसेल, तर हें माझें मोठें दुर्भाग्यच आहे.

(स्तब्ध बसतो.)

पार्वतीबाई—इतक्या कां विकोपाला गेलं हें प्रकर्ण! इकडे स्वारीवर जाऊं नये, जय मिळूं नये, इकडची कीर्ति होऊं नये, अशी का माझी इच्छा आहे ? माझें ह्मणणें इतकेंच कीं आपल्या घरची तऱ्हां इकडे माहितच आहे. आणखी ह्मणूनच कायतो माझा नकार. स्वामीकार्याला आणि देशकार्याला मी आपल्या आड येईन असें आपण स्वप्नांत सुद्धां आणूं नका. बेलाशक तयारी करा. पण पायांजवळ माझें इतकेंच मागणें आहे, कीं, आपण गेल्यावर आपल्या मागें घरांत माझा कांहीं एक मान राहावयाचा नाहीं. जाऊबाईचा तोरा तर अधिकच वाढेल. त्यांना तर वाटेल आतां ही एक निराश्रित बटीकच आपल्या ताब्यांत मिळाली आहे. ह्मणून मी पायांजवळ हात जोडून मागणें मागतें, कीं, मलाही बरोबर न्यावें.

युद्धांत जय मिळाला तर आईपार्वतीच्या कृपेनें जयजय-कार करीत पुण्यास परत येऊं, आणि तिची इच्छाच जर कांहीं निराळी असली, तर जी आपली वाट तीच माझी. पण आपल्यामागें, नाहींग बाई मी एक घटकाभर येथें राहायची! (गळ्याला मिठी मारते)

सदाशिवराव—मग हावेळपर्यंत जें कांहीं पुराण झालें तें इतक्याच करितां वाटतें? अग, मग हें पहिल्यानेंच सांगावयाचें होतेंस. घरांतल्या मंडळीच्या उखाळ्या पाखाळ्या काढायचें कांहींच कारण नव्हतें. आणि माझा हेतू तरी पहिल्यापासून तसाच आहे. पण आल्याबरोबर पहिलें वाक्य, मी जातें माहेरीं! विनाकारण तूं आपल्या मनाला त्रास करून घेतलास, आणि मलाही दिलास. बायका वेड्या म्हणून म्हणतात त्याचें उदाहरण हेंच पहा. असो, झालें तें झालें. विश्वासराव बरोबर येतोच आहे. आणि त्याची जर इच्छा असल तर लक्ष्मीलाही बरोबर घे. पण याबावतींत गोपिकावहिनींचें अनुमोदन घेऊन मग काय करायचं असेल तें कर हो.

पार्वतीबाई—मला बरोबर न्यावयाचं आश्वासन आपण दिलेंत, तेव्हां आतां माझें कांहींएक म्हणणें राहिलें नाहीं. (चौघडा वाजतो) अग बाई! मध्यरात्रीचा चौघडा वाजूं लागला. थोडीशीं झोंप नाहीं का घ्यावयाची?

सदाशिवराव— होय, आतां पडावंच घटकाभर.

पार्वतीबाई०—यमुने, दरवाज्याला कडी लाव, आणि तूंही तिथेंच नीज. मला पहाटेस लवकर हांक मार.

यमुना (आंतून) जी बाईसाब, कोंबडा आरवतांच हांक मारीन. (पडदा पडतो.)

अंक पहिला समाप्त.

अंक २ रा.

प्रवेश १ ला.

स्थळ—(कोटपुतळीजवळील मैदान)

जनकोजी—(पत्राकडे पाहून आपल्याशींच) धिः-कार असो या अधम अविंधांच्या नीचपणाला! यांच्या सारखीं कठोर अंतःकरणें हिंसक पशूंचींही नसतील! अरे, यांची काय काळजं आहेत, अगर कातळं आहेत! रणामध्यें पतन पावलेल्या योध्याला लाथेनें तुडवावें काय! आणि तें प्रत्यक्ष माझ्या चुलत्याला! रणसिंह दत्ताजी-शिंद्याला! हाय! हें मी कसें सहन करूं! आणि सहन करीन तर मनुष्य कोटींत माझी गणनाच होणार नाहीं. काय ज्याची योग्यता! काय ज्याची कर्तबगारी! केवढा थोर दरारा! काय विलक्षण शौर्य! हल्लीच्या काळचा केवळ भीष्मच! अशा योध्याची या चांडाळ यवनांनीं धारातीर्थी पडल्यानंतर अशा तऱ्हेची अपमानकारक स्थिती केली, याचें स्मरण वारंवार होऊन माझ्या अंगाचा सारखा भडका

होऊन राहिला आहे! आणि त्याबरोबर माझ्या बापाच्या खुनाचें स्मरण होऊन, या नीचासंबंधीं द्वेषाग्नी अधिकच पेटत आहे. मस्तक भणाणून गेलें आहे. डोळ्यांपुढें सारख्या भडकलेल्या प्रचंड अग्नीच्याज्वाळा दिसत आहेत. मी ह्या पृथ्वीवर उभा आहें कीं, आकाशांत हवेंत उडालों आहें! किंवा एखाद्या महासागरांत वाहत चाललों आहें! कांहींच समजत नाहीं. याप्रमाणें माझी वृत्ती खवळून गेली आहे. दत्ताजीनां मरून आज चार महिनें होत आले, तरी जणूंकाय तो भयंकर प्रकार आज याच घटकेला झाला आहे असें मला वाटतें. नीचा कुतुबशहा! माझ्या चुलत्यांबद्दल तुझ्या वैराचा बदला घेईनच, परंतु माझ्या स्वदेशाकरितां आणि स्वराज्याकरितां आकाश पाताळ एक करून सोडीन! तुला दे माय धरणी ठाय, असें करून टाकीन. ज्याठिकाणीं रणसिंह दत्ताजीचे रक्ताचे पाट वाहविलेस, त्या ठिकाणीं तुह्मां यवनांच्या रक्ताचा पूर वाहवीन! ज्याठिकाणीं त्या महावीर दत्ताजीशिंद्याचें मृतशरीर पडलें त्याठिकाणीं तुम्हां यवनांच्या प्रेताचे पर्वतप्राय ढीग रचीन, नंतर मी आपला देह रणांगणीं ठेवीन. (पत्राकडे पाहून) किती प्रेमळ पत्र हें श्रीमंतांचें! भाऊसाहेब लिहीतात, "तुमच्या चुलत्याच्या मृत्यूची वार्ता ऐकून आमच्या काळजावर जबरदस्त घाय झाला आहे. जगांतून जी व्यक्ती गेली ती कीर्ती रुपानें आह्मांसमोर उभी आहे. शूरांनी दुःखी न होणें. आह्मीं स्वतः चिरंजीव विश्वासरावासहित मोठ्या फौजेनिशीं निघालों आहों आह्मांस कुमक

करण्याकरितां तुह्मीं तुमची प्रकृती सुधारली असल्यास, आग्रे मुक्कामीं येऊन मिळावें. एकत्र जाहल्यावर शत्रूस धुळीस मिळवून देऊं. शूरास रणांगणीं मरण भूषण आहे. हें तुह्मांस लिहिणें नको. जयाप्पाशिंद्याचे मुलास आपले कर्तव्य काय हें अवगत आहेच. शत्रू जरी जबर आहे तरी छत्रपतीशिवाजीमहाराजांच्या पुण्याईनें आपण त्यास मातीस मिळवूं. आह्मीं फौजेनिशीं कोणते मार्गानें यावें, तें आपण आणि सुभेदार काकासाहेब या दोघांनीं विचार करून कळवावें." त्याबद्दल काकासाहेबांनीं श्रीमंतांस पत्र पाठविलेंच आहे. श्रीमंतांच्या इच्छेप्रमाणें मी आपल्या फौजेची सर्व तयारी करून निघालों. आतां हां हां ह्मणतां आग्रा गांठीन. घोर प्रसंगाची आठवण ह्मणजे विराला मोठें उत्तेजन आहे! दत्ताजीशिंद्याच्या मृत्यूची हकीकत काकांना कळविण्याकरितां गेलों, त्यावेळचे त्यांचे उद्गार ह्मणजे माझ्या मस्तकावर त्यांनीं त्यावेळीं जणूकाय शंभर कुऱ्हाडीचे घायच मारिले. पण मी त्याला घाय तरी काय ह्मणून ह्मणावे! काकींनीं जो उपदेश केला तो सर्वथा योग्य होता. हाय! काय त्यांचे शब्द, "जनकोजी, तुझ्या ऐवजीं, शिंद्याचे घराण्यांत एखादी मुलगी जन्माला आली असती, तर एक जांवई अधिक आला असता, आणि तो तरी शूरत्वकरून त्यांच्या मरणाचा सूड घेता," या गोष्टीचें स्मरण ह्मणजे त्यानीं मला पुढील मार्ग दाखविला; तेव्हां आतां या जकनोजाबद्दल मुलगी झाली नाहीं ह्मणून काकींना जें दुःख झालें आहे, त्याचें

सार्थक करून दाखविणें ह्मणजेच जन्माचें सार्थक होय. माझी केलेली प्रतिज्ञा मी शेवटास नेईन तरच नरवीर जयाप्पाशिंद्याचे पोटीं आल्याचें सार्थक करीन ! (वर पाहून) हाय ! हाय ! ते पहा (हात दाखवून) माझे बाबा, माझे काका, विमानांत बसून मजकडे मोठ्या प्रेमळ दृष्टीनें पाहून मला सांगत आहेत बाळा जनकोजी, आमच्या रणशूर, स्वामिनिष्ठ वंशामध्यें जन्म घेतला आहेस, रणांगणी देह ठेवून उभयलोकीं पुण्य आणि कितीची जोड कर. आज आह्मां शिंद्याचावंश ह्मणजे कर्दनकाळ म्हणून गाजलेला आहे. पुढें आह्मांमध्यें कोणी षंढ जन्माला येणारा असेल तर येवो, पण सांप्रत तूं तरी तसा बनूं नकोस. असं काय ! ठीक आहे. बाबा, काका, आपल्या आज्ञेप्रमाणें स्वामीसेवाकरून होईल तितकी शिकस्त करीन ! यवनांचा पाडाव करीन ! आणि आपल्या इच्छेप्रमाणें रणांगणीं देह ठेवून आपल्या सेवेकरितां स्वर्गलोकीं येईन. काका, अहो बाबा, आपल्या ह्या इच्छेप्रमाणें माझा हेतू साध्य होईल किंवा नाहीं याची मला, ज्यावेळीं मी भयंकर प्रसंगांत सांपडून, गोळी लागून, जखमी झालों होतों, आणि कबिल्यासह जानराव बावळे वगैरे मंडळीच्या साहाय्यानें कोटपुतळीस सुभेदारसाहेबांच्या आश्रयाला गेलों होतों, त्यावेळीं मात्र मला शंका होती; परंतु ईश्वरानें त्यांतून पार पाडलें आहे, हल्लीं मी ताजा तवाना झालों आहें. माझ्या

अंगीं पूर्ववत् शक्ती आहे. आतां त्या यवनांचा नायनाट केल्यावांचून मी स्तब्ध राहीन असें मनांतसुद्धां आणूं नका.
(जातो.)

प्रवेश २ रा.

स्थळ—आग्र्याचें मैदान.

(आग्रा येथील मैदानांत तंबू मारून सदाशिवराव, विश्वासराव, बळवंतराव व विंचूरकर बसले आहेत असा पडदा उघडतो.)

सदाशिवराव—(पत्र वाचून पुरें झाल्यावर) बळवंतराव पाहिलेंत का मल्हारराव होळकर काय लिहितात तें ऐकाहं, "आपण एकदम पुढें दिल्लीकडे येण्याचा विचार केला ही मोठी चूक होत आहे. इकडे येण्यासंबंधीं ज्यांनीं आपणांस सल्लामसलत दिली त्यांनीं योग्य विचार केलेला नाहीं. रोहिला, सुजाउद्दौला, नजीबखान, कुतुबशहा आणि अहमदशहा दुराणी, हे कांहीं सामान्य पुरुष नाहींत. सल्लागारांनीं श्रीमंतांस पुढें आणून पेंचांत पाडलें आहे. आपण माळवे प्रातांत राहावें अशी माझी सविनय प्रार्थना होती, मात्र सडिफौज पुढें पाठवून द्यावी. आह्मीं आपले दमावरच कार्य उरकून घेतों."

बळवंतराव—श्रीमंत, शिंदेहोळकरांनीं या मुलखांत बहुतेक जन्म घालविला. तेव्हां हा मुलख आपलाच आहे, असें ते समजतात. ह्मणून आपण आतां इकडे आलेले त्यांस कसें बरें वाटणार ? गिलच्यांची आपणास भिती घातली ह्मणजे आपला अनायासेंच कांटा निघाला. वः काय

युक्ती आहे ! श्रीमंत, आपली पुण्याई जबर आहे. आपलें नुसतें नांव ऐकतांच गिलच्यांचा थरकांप होईल. मग स्वारीची वार्ता कळतांच गर्भगळीत होतील यांत काय संशय !

विश्वासराव—भाऊसाहेब, राजकारणांतील डाव पेंच जरी मला माहीत नाहींत, कारण ते अनुभवानेंच कळणार तरी सरळ पाहतां मला असें वाटतें कीं, आजदिनपर्यंत ज्या नेकजात सेवकांनीं गादीशीं कधींच बेइमानी केली नाहीं, ते याच प्रसंगीं असें वर्तन कां बरें करतील? या उपर आपली मर्जी.

विंचूरकर—श्रीमंत, बोलतों याची माफी असावी. मल्हारराव यांनीं लिहिलें तेंच बरोबर आहे. आपण सध्यां माळवे प्रांतीं छावणी करून राहणेंच आपणांस फायदेशीर झालें असतें. कारण एकतर आपल्याबरोबर जनाना, शिवाय शत्रू जोरावर आहे.

सदाशिवराव—(हांसून) नुसतें होळकरांनीं लिहिलें नाहीं तोंच तुमचीं धाबीं दणाणूं लागलीं. मग प्रत्यक्ष सामोरा झाल्यावर काय होणार ? शत्रू जबरदस्त असला तर आह्मीं काय नामर्द आहों. माझीतर इच्छा आहे कीं, शत्रूशीं दोन हात व्हावे ह्मणून. बरें पण मल्हाररावाकडे मी स्वार पाठविला असतां, तो अझून कां बरें येत नाहीं. (एक जासूद येतो.)

जासूद—श्रीमंत, सुभेदार मल्हारराव आले आहेत.

सदाशिवराव—ठिक आहे. जा त्यांना घेऊन ये.

जासूद—जी सरकार. (जातो. मल्हारराव होळकर व जाट येतात, त्यांस पाहून)

चोपदार—मुजरेपर निगा किजीये महाराज.

(दोघे मुजरा करितात.)

सदाशिवराव—या काकासाहेब, बसा असे. सुरजमल्ल बसा. (दोघे बसतात.)

मल्हार॰—श्रीमंत, आपणाला यमुनेच्या पलिकडे रहा ह्मणून विनंती केली होती, मग पुढें येण्याचें कारण काय बरें होतें ? आतां आह्मीं जास्त बोलावें असें नाहीं. आपण पुढें आलांत ह्यावरून आपणास योग्य सल्ला मिळाली असें दिसत नाहीं. पूर्वीं आपले वडील, चिमाजीआप्पा वसईचे किल्लयाला वेढा देऊन बसले होते, त्यावेळीं सुद्धां त्यांनीं माझी ह्मातार्‍याची सल्ला घेतली, ह्मणूनच आज आपण हे दिवस पाहतां आहां.

सदाशिवराव—काकासाहेब, आपण ह्मणतां तें सर्व माझ्या ध्यानांत येऊन चुकलें आहे. अशा लपंडावी का-र्यानें तुमचें कार्य साधावयाचें नाहीं.

मल्हारराव—श्रीमंत, यांत कार्य कोणाचें, व लपंडाव तो कसला ? आह्मीं गादीचे जुने नोकर, आह्मांस जें खरें दिसेल तें आम्हीं स्पष्ट सांगू. आंत एक व बाहेर एक असें आमच्या जवळ नाहीं.

सदाशिवराव—मी सर्व समजतों; बरं सुरजमल्ल सध्यां आमच्या जवळचा रोकड खजिना संपला आहे. तेव्हां

दिल्लीच्या तख्तावरील छद मोडून त्याचें नाणें पाडावें अशी माझी इच्छा आहे. ह्या उप्पर आपला काय विचार आहे ?

सुरज०—श्रीमंत, पादशाही तख्ताची मर्यादा राखली पाहिजे, पूर्वी नादीरशाही झाली होती, त्यावेळेस तख्तावरचे सोन्याचे कळस नेले; परंतु छदास हात लाविला नाहीं. त्यानंतर कंदाहारचा पादशाहा अबदुलअल्ली दोनवेळ स्वाऱ्या करून गेला; त्यानें तोफा नेल्या परंतु तख्ताची अमर्यादा केली नाहीं. सध्यां मी पादशाही उमराव आहें ह्मणून विनंती करतों कीं, तख्ताची अमर्यादा करूं नये. अशानें आपणास यश येणार नाहीं. आपणांस खर्चाची अडचण असल्यास मला सांगावें. मी पांच लक्ष रोख रुपये आपणांस देतों. शिवाय लागेल तो दाणा व साहित्य पुरवीन; पण छदास हात लावून तख्ताची अमर्यादा करूं नये. लष्कर झांशी अगर ग्वालेर येथें ठेवावें. सर्व मसलती व कारभार येथूनच करावा.

सदाशिवराव—सुरजमल्ल, खरंच पुसाल तर बादशाही तख्ताचे छद रुप्याचें असण्यापेक्षां सोन्याचेंच असलेलें चांगलें. म्हणून तें मी काढविणार आहें.

सुरज—मला सर्व कांहीं समजतें. माझी अशी इच्छा आहे कीं, आपण छदास हात लावू नाहीं ग्याजुद्दिन खानाला वजिरातीचीं वस्त्रें देऊन त्याचा गौरव करावा. कारण शिंदे, होळकर व मी, असे आह्मीं तिघांनीं त्याला दिल्लीचे वजिरातीचीं वस्त्रें देण्याचें कबूल केलें आहे. तें

आह्मांला माघारा घेतां येणार नाहीं. शिवाय जोंपर्यंत आपण तेथें आहांत, तोंपर्यंत आमच्याच सल्ल्यानें वागावें. ह्मणजे दुराणी असेल त्या ठिकाणाहून आपले पायांशीं बांधून आणूं.

सदाशिवराव—आह्मी दक्षिण देश सोडून जे इतके दूरवर आलों ते कांहीं दुसऱ्यांच्या जिवावर नाहीं. आमच्या तरवारी ह्मणजे कांहीं भाजी चिरण्याच्या विळ्या नव्हेत. आमची सल्ला तुह्मांस पसंत नसल्यास वाटेल तर रहा अगर जा.

सुरज–जशी आपली मर्जी. (मल्हाररावाकडे पाहून) मल्हारराव आतां येथें राहण्याला माझें मन लागत नाहीं. मी इकडे आलों हाच मूर्खपणा केला. बरें आहे, भाऊसाहेब आपण दोघेही हिंदु आहों. तेव्हां धर्मास कांहीं आड येणार नाहीं असें वर्तन करा ह्मणजे झालें. सध्यां माझ्याच्यानें येथें बसवत नाहीं.

सदाशिवराव–या बरं. ह्या राजकारणाच्या गोष्टी आहेत. तेव्हां त्यांचा राग मनांत धरूं नका. सगळ्या गोष्टी प्रत्येकाच्या मनाप्रमाणें होऊं शकत नाहींत.

(जाट जातो.)

विश्वासराव-भाऊसाहेब, ह्या वेळीं जाट रागावून गेले हें चांगलें नाहीं. कोणती वेळ कशी येईल याचा नेम नाहीं. आपण सध्यां पैशाच्या अडचणींत आहोंत. तेव्हां पैसाअडका कमीजास्त लागल्यास आपणास त्याच्या

जवळून वाटेल तेव्हां मिळेल. कारितां त्याचें मन दुखवूं नाहीं. शिवाय सध्यांच्या प्रसंगीं आपणां सर्वांचें एकमत असणें किती अवश्य आहे, हें मी आपणांस सांगावें असें नाहीं.

मल्हारराव–रावसाहेब, जाट गेला तर गेला. त्याला आपण रहा ह्मणून ह्मटल्यास तो थोडाच रहाणार आहे.

भाऊसाहेब–बरं आहे. त्याचा विचार पुढें करूं. चला आतां. [जातात.]

अंक २ प्रवेश ३

स्थळ––यमुना नदीचें अफाट मैदान.

(अहमदशहा दुराणी, सुजाउद्दौला, मनसूरअल्ली, रहिमतखान, रसूलखान वगैरे सरदार विचारांत बसले आहेत असा पडदा उघडतो.)

अहमदशहा—खुदाके नजरसे आज दिन् तखके, आपनी फतेह होती चली है. हारामजादे मरगट्टे लोगोंने बहोत् शिकस्त किई. हमारे फोजका जमाव बहोत् ही भारी होनेसे उन्का कुछ्भी चलता नहीं है. मगर् वह् षयतान् कुच्तोभी जिआदा फैफ् मचाईंगे, इस्लिये उन्को दहशत किस् तऱ्हांसे पोहोंचेगी वयसा कुछ् तो भी इलाज करना चाहिये. शिकस्तसे लढनेवाले रनशूर मुसलमिनोंके आगे इह मरगट्टोंकी क्या लियाकत् है ? फकत् खुदातालाकी मेहेरबानी चाहिये.

सुजाउद्दौला—गरिबन्नवाज, मिझाजे मुबारिखनें किस्बातकीभी फिकर न कीजिये. मरगट्ठे सरदारोंकी लिये जो कभी हमारे दिलमें दहशत् पैदा होगी, तो फिर् ऐसाहि समजना चाहियेके शेरचुवेको डरता है. हम् लोगोंकी सम- शेर चलानेकी तासीर देखके और मेरट्ठोंकी हुई कत्तल् दिलेंमेंलाके पेसवा भाऊसाब बहोत् करके बेहोषमन् गया होगा. मुझे तो ऐसा मालुम होता है के, शायत् वह काफीर दख्खन्को भग् जानेकी तयारी करता होगा. उसके फिकर मंद् होनेकी कुछ भी जरूरत् नहीं है. और आजका वख्त खुदातालाके फज्लसे बहोत्ही बाहारदारीका है. दिन् बदीन् हमारे फौजकी सरसीही होते चली है, सब् मरगट्ठोंकी थोडेही दिनके अंदर गारतकर देयंगे. मगर् उनके साथ् जान् ज्याय् तो बेहत्तर है. सलाह करनेका नहीं.

मनसूर—लाहोलवलाकुवत, आलम्पनाह, आपके कदम तुफइलसे इन्सब सैतानको हमारे बडे लढ्वय्ये सरदार दोझक्खको पहोंचा देयंगे. मगर् उनके साथ लढनेको औरभी फौजका जमाव चाहिये, मरगट्ठे सैतान किसवख्त् क्या करिंगे उस्का अंदाजभी मालम होना मुष्कील है. हरामजोदे, आज इधर, तो कल सो कोसके उपर धूम मचाते है. खबर हुवाके आग्रेके उपर उन् लोगोंके फौजकी दौड आपहुंची है. तो दोघडीसे सुनते है के उन् लोगोंने हजारों मुसलमीनोंकी कत्ल् करके बडे सिफाहत्से दहयूली काबीज किई. तो इस् तऱ्हाके लोगोंके साथ, आज जो

कभी आपनी फत्तेह हो गई है, तोभी आंखरको हम् मुस-लमीनोंकी इस् तऱ्हांकी जियारी रहेगी ऐसा मेरे दिलको मालुम होता नही. सैंकडो कोस तख्के मुलुख वह कम्-जादोंनें बेचिराख करडाला है. तो बेहयूतर है के, उन् लोगोंके साथ सलाह करना. बादको फिर, जिस् वख्त पेसवा देखनको अलोट जायगा. उस् वख्त उसके पिछा-डिके उपर हल्ला करके, उसके सब् लोगोंको दुनियाके पार करदेना. फिर् गरीबपरवर आपका होकम् जिस् तऱ्हांसे होगा उस् मुआफिक तामील बजानेके लिये हुजूरके बन्दे तय्यार है.

सुजाउद्दौला—मैं ऐसा अर्ज, पेशकरता हूं के, उन् षैतानोंकेलिये मिझाजे मुबारिख्, मुबारिखने इत्ना फिकर् मंद होना नही. मुसलमीनोंके आगे, उनकी क्या लियाकत् है. हम् उन् लोगोंका बेशक धुंवा उडा देयेंगे. अगर्चे हुजू-रका दिल न चाहताहो, दुष्मन् पेसवेके तरफ आपने वकील के सात, इतल्ला करनेका खलिता भेज देना, और उसीके तरफसे क्या जबाब मिलता है, सो देख्के बादकोफिर् चढाई करनेका मनसुबा मुकरर् करना.

अहमदशहा—खैर, यहि मनसुबा हमको मंजूर है. क्यौंके दुष्मन् मरेठे शिवाजीके वख्तसे, आज दिन् तख्के बडे जोरावर बने हुवे है. उनके साथ, पहिले सलाह् करके बाद, चढाई करना यही बाद उमरी है. क्यौं रह्मतखान तुमारी सलाह कैसी है ?

रहिमतखान—गरीबन् नवाज, नबाब सुजाउद्दौला सहाबने आपकु जो सलाह बताई है, वोह बहोत्‌ही उमदा है. और मेरा दिल्‌भी वहि चाहता है. इन् दुष्मनोंको बेषग् ठगाके दुनियाकेपार करदेईंगे, तो आपके वकीलके साथ, खलिता भेज देना. फिर् जैसी खुदावंतकी मर्जी.

अहमदशहा–कौन् हार्जार है ?

(चोपदार येतो.)

चोपदार—क्या हुकुम् है. गरिबन् नवाज ?

अहमदशहा–वकील कासिराज, अभीकेअभी हजर होवे.

चोपदार—जो हुकुम्. (जातो व परत येतो.) गरिबन् नवाज, सरदार कुतुबशहाकि तरफसे एक सवार खलिता लेके आया है. फिर मालिक का जैसा हुकुम् होवे ?

अहमदशहा—उस्‌को अंदर भेज देना.

(चोपदार जातो. एक स्वार गाठोडें व खलिता घेऊन येतो.)

स्वार–(मुजरा करून) खुदावंत, इह खलिता, और मराठा सरदार बुंदेला गोविंद उसका सर, आपको नझर करनेके लिये सरदार कुतुबशहानें मेरे साथ भेज दिया है. तो खुदावंतकी उसकेउपर निगा पहुंचे.

अहमद०–अय खुदाताला, आज तुने मेरे उपर निहायत रहेम नजर किई है. सुजाउद्दौलासाब, वह खलिता बाचिये. और वोह सर खोलके दरबारके बीच सबोंको देख लेनिदो.

सुजाउद्दौला—(खलिता वाचतो) हुजूर, सरदार कुतबशहा इस् तऱ्हां लिखते हैं के, बडे शिकस्से मराठा

सरदार बुंदेला उसकी कतल् करडाली, और सर खुदावंतको नझर करनेके लिये भेज दिया है.

अहमद०—इह बात् सुनके मेरा दिल् निहायत् खुष् होगया है. सुजाउद्दौला साब कुतुबशहाको बहोतही उमदा खिलत भेज देना. और यही सर खलितेके सात भाऊ पेसवे तरफ भेज देना. यह देखके ओ बहोतहीडरकेमारे, इतल्ला करनेको तय्यार हो जायगा. और दखन्के तरफ् भग् जायगा. फेर जो कुछ् करनेका है सो देख लेईंगे.

मनसूरअली—वाहवा खुदावंतनें बहोत् अच्छी तरकीब् निकाली है.

अहमदशहा—सुजाउद्दौलासाहाब, काशीराज वकील आवे वहांतकके खलीता तय्यार करके रखना, और उसकी साथ जलदीसे भेजदेना. अब दरबार बरखास्त कीजीये.

(जातात.)

प्रवेश ४ था.

स्थळ--(पानिपत येथील पेशव्यांचे लष्कराची छावणी)

(जमादार, हवलदार व शिपाई बसले आहेत असा पडदा उघडतो.)

जमादार—मालक पेशवे सरकार बाजीराव साहेब, ह्यांच्या वेळेपासून आजदिनपावेतों मी किती तरी लढाया मारल्या! मी म्हातारा झालों! माझे केश पिकले! पण अशी अन्नान दशा कधींही झाली नव्हती! काय हा हल्लींचा प्रसंग! आपण सगळे एकमेकांचे बंधु, पण परस्परांना असें वाटतें

कीं, एकमेकांना कापून खावें कीं काय! असा धान्याचा दुष्काळ लढाईवर असतांना कधींही पडला नव्हता. एक रुपयाला एक शेर धान्य! काय हें! आणि त्यांतूनही पगार वेळच्या वेळेवर मिळत नाहीं. आज दोन महिन्यांचा पगार पेशवेसरकारांकडे तुंबून राहिला आहे. छेः आपल्याला ही उपासमार आतां सहन होत नाहीं. आपण तर आज सरकाराला जाऊन सांगणार, कीं भरपूर पोटाची व्यवस्था करून द्या, ह्मणजे स्वस्थपणें डाळबाटी खात पडून रहातों, नाहींतर हल्ला करण्याचा तरी हुकूम द्या; आणि ही माझी विनंति पेशवेसाहेबानीं मान्य केली नाहींच तर आपण तरवार खेंचून कांहीं शत्रूच्या प्राणांची आहुती पानिपतच्या रणभूमीवर देऊन, अर्थात् मरणार!

हवलदार—जमादारसाहेब ह्मणतात तें अगदीं खरें आहे. हल्लींची स्थिती फारच भयंकर झाली आहे. काल संध्याकाळीं माझा मनुष्य बाजारांत शिधा आणण्याकरितां गेला होता; त्याच्या जवळ आह्मां दोघां पुरतेंच शिधा सामान होतें. तेवढ्याकरितां आमच्याच फौजपैकीं सुमारें पांच सहा इसम त्याच्या भोंवताली जमले, आणि त्यांनीं तें सर्व सामान त्याच्यापासून छिनावून घेतलें. एकानें तर त्याच्या कानांमधील सोन्याचें साधरण गुंजभर सुंकलें होतें तें कान तोडून हिसकावून घेतलें. आपआपसांत असले प्रकार सुरुझाले आहेत. पोटाची आग विझविणें कठीण झालें आहे. त्यापेक्षां आपण शत्रूला मारून मरावें हेंच उत्तम. चला आतांच सरकाराकडे मीही तुमच्या बरोबर येतों.

शिपाई--जमादारसाहेब, हवलदारसाहेब, आपण उभयतांही आह्मां शिपायांचे पेक्षां मोठाले अधिकारी. आपला पगार किती तरी ज्यास्त. त्या आपली जर ही स्थिती आहे, तरमग आह्मां गरीबांची काय बरं असेल? अहो काल दुपारीं पावशेर खिचडी मोठ्या शिकस्तीनें मिळवून नुसत्या तिखटा-बरोबर खाल्ली आहे! काय ही पेशव्यांच्या सैन्याची दशा! अशा स्थितींत येऊन पोंहचलेले आह्मी शिपाई आतां लढाई तरी काय मारणार! पण केवळ स्वामिनिष्ठा आणि आमच्या रक्तांत भरलेला स्वदेशासंबंधीं अभिमान, या दोन गोष्टीमुळें आमच्या हातून कांहींतरी देशसेवा घडल असें वाटतें, करितां आपणां उभयतांना आह्मां सर्व शिपायांची अशी प्रार्थना आहे कीं, आपण सर्वत्रांनीं मिळून सरकारकडे जावें, रोजमुरा मागून घ्यावा, आणि हल्ला-करण्याची लवकर आज्ञा मिळेल अशी तजवीज करावी. असें कुचंबत बसणें आह्मां प्रत्येकाला दुःसह झालें आहे. (एक शिपाई येतो)

शिपाई—(मुजराकरून) जमादार साहेब, आज लष्करांत अशी खबर आली आहे कीं, पेशवे सरकार संध्या-काळीं सर्व लष्कराला बोलावून पगार चुकते करून देणार आहेत. त्यांनीं दिल्लीच्या तख्तावरील छद काढून त्याचे चांदीचे रुपये पाडिले आहेत. आतां आपणा सर्वत्रांना कांहीं दिवस तरी उपासमार होणार नाहीं.

हव०-अरे, काय ह्मणतोस काय! ही गोष्ट खरी आहे?

आणि तसें जर असेल तरमग भरपूर पोटाला मिळाल्यावर आह्मीं इमानी मराठेगडी स्वामी करितां आकाशपाताळ एक करून टाकूं, पोटभर अन्न मिळाल्यावर शत्रूला मातीस मिळविणें ह्मणज आमची सहज लीला आहे.

जमादार—खरोखर ही वार्ता ऐकून माझ्या मनाला मोठा आनंद झाला आहे. आमच्या फौजेला जरीएक वेळ पोटभर अन्न मिळालें तरी आमच्या सरकारांकरितां व देशाकरितां आम्हीं शिकस्तीनें लढून शत्रूला मातीला मिळवूं. बरं, चला आतां सर्वांनीं प्रथमतः माध्यान्ह काळची व्यवस्था केली पाहिजे; आणि मग सगळ्या गोष्टी. (जातात.)

अंक दुसरा समाप्त.

अंक ३ रा.

प्रवेश १ ला.

स्थळ—पानिपतचें मैदान.

(सदाशिवरावभाऊसाहेबांचा तंबू.)

(सदाशिवराव, मल्हारराव होळकर, जनकोजी शिंदे, बळवंतराव मेंहदळे वगैरे मंडळी बसली आहेत, असा पडदा उघडतो.)

मल्हारराव—सरकार, गादीचा अधिकार मोठा, तेव्हां आह्मीं सेवकांनीं बुद्धिवाद करणें गौण. परंतु आह्मांला वयानें आपल्याला उपदेश करण्याचा अधिकार पोंहचतो. कारण शिंद्यानीं सरकारचा जोडा संभाळावा, आणि होळकरानीं पलंग चौकीचा पहारा करावा. आणि तो आज

दिनपर्यंत केला, पुढेंही करूं. सरकार, बेअदबीची माफी असावी. आह्मीं पिढीजाद इमानी नोकर, त्या आह्मांवर अविश्वास ! वळवंतराव सांगतील तें प्रमाण ! मी ह्मातारा जाबुवंत मूर्ख ! आणि हें बेडकीचें पिलुं मोठें राजकार्य धुरंधर ! याची किंमत चिखलांत बसून हत्तीच्या आंगावर ओरडण्याची. हा प्रत्येक वेळीं आपल्याला गैरसल्ला देऊन बुडवीत आहे. त्याचा विचार करा. एकतर आमच्या-सारख्या साठीबुद्धीनाठी झालेल्या मनुष्याचें ऐकावें अगर आह्मांस स्वदेशीं जाण्याची रजा द्यावी. याउपर आपले मुत्सदी आपले प्रधान बळवंतरावसाहेब मेहंदळे, यांच्या सल्यानें पुढें मोहिमेचें काम चालूं द्यावें. आणि आह्मां हिंदुच्या शिवछत्रपतींनीं स्थापन केलेल्या राजरुपीं इमारतीची आणि स्वधर्माची त्यानीं जी प्राणप्रतिष्ठा केलीं त्याची आहुती यव-नांच्या मुखांत द्या. आतां माझें डोकें फिरून गेलें आहे. मला कांहीं बोलवत नाहीं. भाऊसाहेब यावेळीं तुह्मीं अगदीं वेडे बनले आहांत अधिक प्रसंगाची सेवकाला माफी असावी.

सदाशिवराव—काकासाहेब, आपण असे रागाऊं नका. हल्लींचा प्रसंग असा आहे कीं, लांडगे तोंडकरून यावेळीं शत्रूला जेरीस आणलाच पाहिजे

बळवंतराव—(मध्येंच) नाहीं नाहीं, आह्मीं तुम्हां-ला शरण येतों, आह्मांला जीवदान द्या, आह्मां सर्वांना मुसलमान करा, असें त्या अहमदशहादुराणीला हा जाऊन सांगितलें पाहिजे.

जनकोजी—बळवंतराव, तुह्मीं हें काय बोलतां! कोणाला बोलतां आहां! ज्या आपल्या पितामहाला आपण सर्वत्रांनीं बहुमान दिला पाहिजे त्या काकासाहेबहोळकरांना असें तुह्मीं कुत्सित बोलतां हें अत्यंत गैर आहे. प्रसंग कसा आहे याचा नीट विचार करा. तुह्मीं शूर आहां. मुत्सद्दी आहां. असें असून काय उद्गार काढतां हे! कांहीं तरी प्रसंगाचा विचार करा.

बळवंतराव—जनकोजी, आमची इच्छा अशी आहे काय, कीं आह्मां मराठ्यांना अपजय यावा ह्मणून? खचित् नाहीं. मुसलमानांच्या वरती चढकरून जय मिळवावा ही आह्मां मुलांची बलवत्तर इच्छा. त्याच्या आड हल्लीं काकासाहेबहोळकर येत आहेत. हेंच मला वाईट वाटत आहे. हल्लीं काकासाहेबांची सल्ला, धिम्मेपणा ठेवावा ही अगदीं चुकीची आहे.

मल्हारराव-होय, आमची सल्ला चुकीची आहे. आपण आपला जलालपणा दाखवा आणखी यश संपादन करा. सुरजमल्लजाटासारख्या ह्मातान्याची अमर्यादा केलीत ही गोष्ट उत्तमच झाली! आणि तशीच आज माझी करीत आहां! पेशवाईचें दैव फिरलें आहे! आह्मां महाराष्ट्रीयांची कंबक्ती भरली आहे! बळवंतराव ही तुमची सल्ला फार चुकीची आहे. ईश्वरानें तुमच्या कपाळीं अपयशाची जोड लिहिली असेल तर बेलाशक माझें ऐकू नका.

सदाशिवराव--काकासाहेब, आपण यावेळीं पंचांत

सांपडलों आहों. आपली फौज धान्याच्या कमतरतेमुळें त्राहीत्राही होऊन राहिली आहे. अशा स्थितींत धिम्मेपणा ठेवणें फार दुरापास्त आहे. यावेळीं चढाई करून जाणें हेंच योग्य. आपली सल्ला निदान मला यावळीं तरी योग्य वाटत नाहीं.

मल्हारराव—भाऊसाहेब, बोलतों त्याची माफी असावी. खासास्वारीला पूर्वीं कळविलेंच होतें, स्वतः येण्याचें कांहीं-एक कारण नाहीं. आह्मीं राजकारण पार पाडतों. कुमक मात्र पाठवावी. तें आपणांस रुचलें नाहीं. आतां जो विचार करणें तो करावा. आह्मीं सेवेस हजर आहों.

बळवंतराव—आपण, सेवेला हजर! काकासाहेब हें भलतेंच काय बोलतां! आपण आज्ञा करावी! पेशवे आपले नोकर, ती मान्य करायला तयारच आहेत. माझ्या-सारख्या बेडकीच्या पोराच्या ओरडण्याकडे आपण लक्ष देऊ नाहीं.

जनकोजी—बळवंतराव, आतां तुमच्या कुत्सित स्वभावाची कमाल झाली. (रागानें) शिंदे होळकर ह्मणजे चिखलांतले किडे आहेत, त्यांना कांहींच ज्ञान नाहीं, त्यांच्या अंगीं शूरत्व नाहीं, असें कां तुम्हीं समजतां? ठीक आहे. आह्मीं स्वस्थ बसतों. आपल्याला काय दिवे लावावयाचे आहेत ते लावून दाखवा.

विंचूरकर—श्रीमंत, काकासाहेब, अहो जनकोजी, तुह्मां सर्वत्रांना माझी अशी प्रार्थना आहे कीं, यावेळीं आपण

सर्वांनीं एक विचारानें राहून शत्रूचा पाडाव करण्याची युक्ती शोधून काढली पाहिजे. इतका वेळपर्यंत मी नुसती मजा पहात बसलों, ही सुद्धां माझी चूकच झाली. पण असें पाहिलें कीं, आपण मध्यंतरी बोलणें ह्मणजे दोन्हीं पक्षाला वाईट वाटेल. पण शेवटीं राहवेना ह्मणून मधीं तोंड घालणें भाग पडत आहे. माझें म्हणणें असें आहे कीं, आपल्या मध्यें झालेल्या दुफळीचा आतांच्या आतां सांधा जूळवून टाकावा. काकासाहेब, आपण वृद्ध, अनुभवी, सर्वत्रांना वडिला सारखे आहांत. श्रीमंत भाऊसाहेबापासून सर्व अडाणी मुलें आहेत. यांना आपण अक्कल शिकवा, आणि पुढें जें करणें तें योग्य. विचारानें करून मराठ्यांच्या पदरीं अपयश न येईल अशी तजवीज करा. सूज्ञाला जास्त सांगण्याची जरूर नाहीं.

सदाशिवराव–आतां विचाराअंती मलाही असेंच वाटतें कीं बळवंतराव काकासाहेबाना किंचित् अविचारानें बोलले. पण आतां त्या गोष्टी सर्वत्रांनीं विसरून जाव्या, आणि काय करणें तें एक विचारानें करावें. (एक जासूद येतो.)

जासूद–(मुजराकरून)सरकार, दुराणी कडून कोणी काशिराज नांवाचे वकील व दोन हत्यारबंद चाकर आले आहेत. त्यापैकीं एका चाकराचे हातांत एक लहानसें शुभ्र वस्त्रांत बांधलेलें गांठोडें आहे आणि त्या वस्त्रावर रक्ताचे डाग दिसत आहेत. सरकार स्वारीची भेट घ्यावी ह्मणून ते आले आहेत. मग जशी आपली आज्ञा.

सदाशिवराव—काय? शुभ्रवस्त्रांत बांधलेलें! रक्ताचे डाग! काय बरं हें असेल?

मल्हारराव—आपण रणक्षेत्रांत आहों तेव्हां यावेळीं रक्ताचे डागाची परवाच बाळगणं नको. काय असेल तें ताबडतोब कळून येईल. त्यास आंत येण्याची परवानगी द्यावी.

जनकोजी—ते तर तिघेच आहेत, आणि तीन हजार असते तरी काय परवा होती. त्यागाठोड्यांत काय आहे हें प्रथम पाहिलें पाहिजे, करितां सरकारांनीं त्यांना आंत येण्याची परवानगी द्यावी.

सदाशिवराव—अरे, जा त्यांना घेऊन ये (जातो.)

(काशिराज दोन सेवकांसह येतो.)

काशिराज--(मुजरा करून) पेशवे सरकारचा जयजयकार असो.

सदाशिवराव—वकीलसाहेब आपल्या तोंडांतून हे शब्द निघतात! पेशवे सरकाचा जयजयकार! मोठें आश्चर्य आहे!

काशिराज--भाऊसाहेब, हल्लीं मी यवनांचें अन्न खातों आहे. त्यांचा ताबेदार आहें. तरी माझें अंतःकरण यवनाचें बनलें नाही. आमच्या भरतभूमीला आलेली अनिष्ट दशा ईश्वर लयाला नेवो. हा दुराणीनें आपल्याला खलिता दिला आहे, आणखींही एक भेट पाठविली आहे. (एकीकडे) अरे दुर्दैवा, मी हिंदू असून आज मजवर कोणती कामगिरी बजावण्याचा प्रसंग तूं आणलासहा?

(खलिता देतो. व चाकराच्या हातांतील गांठोडें पुढें ठेवतो.)

सदाशिवराव—बळवंतराव, दुराणीकडून काय खलिता आला आहे; तेवढा वाचा पाहू. काशिराज बसा तुह्मीं, उभे कां?

(काशिराज बसतो.)

बळवंतराव—(खलिता वाचतो) "सरदार बहादुर पेसवे सहाब् इन्को मालुम होवे के, आपके साथ सलाह करना ऐसा हमारा बहोत्ही इरादा है. आप् इस् बात्को कुबुल न होतो, आपके सरदार गोविंदपंत बुंदेले इन्की जैसी हालत होई है, उस् मुआफिक आप् सबोंकी होगी. राजा शिवाजीका वख्त् जाता रहा है. इह बात् खियाल में लाके जो कुछ् करनेका हो सो कीजिये. दख्खन्को अलोट जाईये. अगर्चे, दिल न चाहता होगा तो सरदार बुंदेला और सिंदीया दत्ताजी आब् सबोंके मुलाकातके लिये बहोतही तरसे हुये है. चाहे, उन्केतरफ जाके अमन्चमन्मे देहतष्मे आराम कीजिये. दिल् चाहे वैसा कीजीये" खालीं अहमदशहाचा मोर्तबा आहे.

सदाशिवराव—दुराणीकाय लिहीतो आहे? शिंदे आणखी बुंदेले आपली वाट पाहत आहेत याचा अर्थ काय! अरे या गाठोड्यामधें काय आहे तें अगोदर सोडून पहा. (चाकर गाठोडें सोडतो. शीर पाहून) हाय, हाय, हें मी काय पाहतों आहें! हिमालयपर्वताचें गौरीशंकरशिखर माझ्यापुढें कोसळून पडलें आहे! किंवा प्रत्यक्ष माझाच मस्तक माझ्यापुढें कापून ठेविला आहे.

सरदार बुंदेले, गादीच्या चाकरीकरितां तुह्मीं शिकस्त क॰
रून परलोकची यात्रा साधलीत ! आणि आह्मीं कांहींएक
न करितां असेच कुजत पडलों आहों. धन्य आहे तुमची !
तुमची माता खरी वीरमाता होय. वः कमाल केलीत! तुमच्या
सारखे सगळे वीर अशाच तऱ्हेनें दुराणीशीं शिकस्त करितां
जरी धारातीर्थी पतन पावले तरी चिंता नाहीं. गादीचें
यश अखेर कोणीतरी साधलें ह्मणजे झालें. अपजयानें
हें मुख काळें करून पुण्यास कधींही माघारा जाणार नाहीं.
काशीराज, दुराणीला सांगा या लढाईला आतांशा कोठें
रंग येत चालला आहे. इतक्यांत तूं गर्वानें उन्मत्त होऊं
नकोस. माझा जीव की प्राण रणसिंह दत्ताजी आणि
महामुत्सदी बुंदेला या दोघांची कत्तल केलीस ह्मणजे
महाराष्ट्राची गादी तुझ्या स्वाधीन झाली असें समजूं
नकोस. काकासाहेब होळकर, जनकोजी शिंदे, विंचूरकर,
बिनीवाले, बळवंतराव मेहंदळे आणि इतर मराठे सरदार
अशीं अनेक उल्हाटयंत्रें तुह्मां अविंधांच्या काळजांचीं
छकलें उडवून भरतभूमिला सुखीकरण्याकरितां तयार
आहेत. काशीराज तुह्मीं आतां येथें एक क्षणभरही न
थांबतां, अहमदशहाकडे जाऊन त्याला कळवा कीं, आपण
पाठविलेल्या भेटीचा आह्मीं मोठ्या प्रेमानें स्वीकार केला
आहे. याचा बदला आह्मीं तुम्हांला कांहींएक पाठविणार
नाहीं. परंतु ज्या ईश्वराच्या इच्छेनें ही गोष्ट घडली
आणि सरदार बुंदेल्याचा मस्तक आमच्यापुढें आला

त्या जगन्नियंत्याच्या इच्छेकरितां थोड्याच वेळांत तुमचा मस्तक धडापासून वेगळा होऊन, माझा उजवा हात सरदार बुंदेला ज्या ठिकाणीं अखंडसौख्याचा अनुभव घेण्याकरितां गेला आहे, त्या ठिकाणीं, छेः, त्याच्या-करितां परमेश्वरानें स्वर्गामध्यें जो उत्तम महाल उभा-रला आहे, त्या महालाच्या देवडीवर पाहरेकऱ्यांच्या कौतु-का कारितां लटकून राहील. काय समजलांत! अहमदशहाचा मस्तक लटकून राहील, असें त्याला जाऊन सांगा.

काशीराज—श्रीमंत, आपली इच्छा ईश्वर पूर्ण करो. मी आतां आपली रजा घेतों; पण बरोबरचे हे दोन यवन अहमदशहाला मी आपल्याबरोबर फितूर आहें असें क-ळवितील. तेव्हां यांची वाट काय करायची ती आपणच करावी.

जनकोजी—त्यांची वाट! ती अगदीं मोकळी आहे. आतांच छाटून टाकतों. पण नको. या गरीबांनीं आमचें काय केलें आहे? सरकार, यांना कैद करून ठेवावे. काशी-राज, दुराणीला जाऊन सांगा दत्ताजीचें वैर घेण्याकरितां, जनकोजी शिंदा, तुझें नरडें फोडण्याकरितां ईश्वरानें अझून जिवंत ठेविला आहे. बस्स! श्रीमंत, धनीसाहेब, आतां हाच विचार कीं एकदम गिलच्यावर तुटून पडावें. काका-साहेब, आपला काय विचार आहे?

मल्हारराव—जनकोजी, यावेळीं तुमची चित्तवृत्ती ठि-काणीं नाहीं. इतकेंच नव्हे, पण तुह्मां सर्वत्रांची स्थिती

अशीच झाली आहे. काशीराज, तुम्हीं भाऊसाहेबांचा निरोप घेऊन रवाना व्हा. आपण हिंदू आहांत हें विसरूं नका.

काशीराज--ठीक आहे. मी श्रीमंतांची रजा घेतों.

(मुजराकरून जातो.)

मल्हारराव—या गोष्टीचा किंचित् स्वस्थपणें विचार केला पाहिजे. आपल्या पश्चात् कीर्ति रहावी, आपल्या हातून कांहीं चूक झाली नाहीं, नाईलाजानें अपयश आलें तर कोणी दूषण देऊं नये, अशा तऱ्हेचा पोक्त विचार केला पाहिजे. इथें सर्व पोरोंडा झाला आहे. माझ्या सल्यानें वागावयाचें असेल तर श्रीमंतांना योग्य मसलत देण्याला मी तयार आहें; ती एकांती देईन.

बळवंतराव—श्रीमंतांना मसलत द्यावयाची! आणखी ती एकांतीं ! आमच्या देखत नाहीं. तर मग आम्हीं कोण चोर ? घर भेदे ? दरोडखोर आहोंत काय ? आतां मी जास्त बोलत नाहीं. म्हातारपणीं काकासाहेबांच्या बुद्धीला भ्रम झाला आहे. अशी माझी मनोदेवता मला खास सांगत आहे. श्रीमंत सेवकाची अशी विनंती आहे कीं, यांच्या सल्ल्यापासून आपलें खचित् कल्याण होणार नाहीं. पदोपदीं हे आमची वीरश्री दडपून टाकीतआहेत. मग यांतील ईंगीत काय असेल तें त्यांचें त्यांसच ठाऊक !

मल्हारराव—बाबांनों, खग्रास ग्रहणाची वेळ अगदीं नजीक येऊन ठेपली आहे तव्हां अर्थात्, सूर्यप्रकाशाचा समूळ लोप झालाच पाहिजे. (पडदा पडतो.)

प्रवेश २.

स्थळ—पानिपतयेथील पेशव्यांचे छावणी जवळील मैदान.

(जैतागुजर येतो.)

जैतागुजर—(आपल्याशीं) बादशहा अहमदशहा अबदल्लीच्या हुकुमाप्रमाणें, हरप्रयत्न करून येथपर्यंत तर येऊन पोचलों. आतां पुढें कामगिरी कशी काय पार पडते ती पहावी. सदाशिवरावभाऊ तर बुंदेल्यांचें शीर पाहिल्यापासून अत्यंत खवळून गेले आहेत. जिकडे तिकडे हाहाःकार झाला आहे. सरदारांत दुही माजून राहिली आहे. परंतु वीरश्रीनें सर्व कसे खवळून गेले आहेत. बळवंतराव मेहंदळे तर गर्वानें अगदीं ताठून गेले आहेत. ते मल्हारराव होळकरांचा ठिकठिकाणीं उपमर्द करीत आहेत. लष्करांत जाऊन पाहावें तर तिकडेही गडबड, दाणावैरण बाजारांत मिळत नाहीं. शिपाईलोकांचे पगार मिळूनही स्वस्थता नाहीं. ह्या एकंदर सर्व गोष्टी दुराणीच्या कानावर घातल्या ह्मणजे आपली कामगिरी झाली. (जरा पुढें जाऊन) अरे, पण लोक इकडे कोणीकडे चालले आहेत ! (कानोसा घेऊन) छेःछेःहे तर गस्तवाले खचित् नाहींत. इतके स्वार रात्रीच्या गस्तीला कधींच निघत नसतात. निशाण व डंकाही बरोबर आहे. हे तर आमच्या छावणीकडेच चालले आहेत ! छेः, पण ही समजूत चुकीची असेल! ते चंदीचारा गोळा

करण्याकारितां बाहेर पडले असतील! तर मग डंका निशाणें बरोबर कां! (पुनः विचारकरून) न जाणो, एखादी ही टोळी आमच्या छावणीवर चढाई करण्याकारितां जात असेल! पण नव्हें, या पहा, त्या गर्दीमध्यें कांहीं स्त्रिया आणि पुरुषही आहेत. हा काय चमत्कार असावा! हां समजलों. मघांशीं ते पलिकडल्या बाजूला लष्करांतील लोक बुंदेल्याची स्त्री सती जाणार ह्मणून ह्मणत होते. त्याचीच ही तयारी असेल. आतां माझी कामगिरी ह्मटली ह्मणजे दुराणीच्या गोटांत जाऊन ही खबर पोंहचविली कीं, संपली. (किंचित् विचार करून) देवा, मी जातीचा मराठा. यांच्याच हाडामासांचा. पण यावेळीं यवनाचा दूत होऊन मराठ्यांच्या छावणींतील भेद काढण्या कारितां या ठिकाणीं यावें लागलें ! देवा! हें माझ्या नशीबीं तूं काय लिहिलें आहेस. काय करावें कांहीं सुचत नाहीं. पेशवे सरकारांना अनुकूळ होऊन दुराणीकडील खबर त्यांना दिली तर ही गोष्ट यवनांना कळल्या बरोबर ते मला पकडून तोफेच्या तोंडीं देतील. अशा तऱ्हेनें विनाकारण प्राणाला मुकण्याचें माझ्या अंगीं धैर्य नाहीं. तेव्हां आजची ही खबर दुराणीच्या गोटांत जाऊन कळवावी; आणि यवनांची नोकरी सोडून कुठंतरी पळून जावें. पुनः यवनांची सेवा केली नाहीं ह्मणजे हीच माझ्या ज्ञाती बांधवांना मदत केली असें होऊन, ईश्वर माझ्या पूर्वीच्या अपराधाद्दल मला क्षमा करील. जावें तर आतां. (जातो.)

प्रवेश ३.

स्थळ—यमुनानदीचें मैदान.

(गोविंद पंत बुंदेल्यांची स्त्री सरस्वतीबाई मळवट भरलेली चितेजवळ उभी आहे. जवळ पार्वतीबाई, भाऊसाहेब, बाळकृष्णशास्त्री. गोविंदपंत बुंदेल्याचा मुलगा बाळासाहेब व इतर सरदार उभे आहेत, असा पडदा उघडतो.)

सरस्वतीबाई—बायांनो, तुम्हां सर्वत्रांच्या पुण्याईनें हा छिन्नविच्छिन्न झालेला देह, आणि त्यापासून वेगळें झालेलें माझ्या प्रियाचें मस्तक, मला लाभल्यामुळें आजचा हा सुयोग आला आहे. माझ्या लग्नसमयीं, जरी मी अज्ञान होतें, तरी त्यावेळचें मला सगळें स्मरण आहे. त्यावरून तुह्मांला सांगतें कीं आह्मां उभयतां मधें अंतरपट धरल्या नंतर, आतां थोड्याच वेळानें त्यांची मूर्ती मला दिसणार, ह्मणून जी उत्कंठा माझ्या मनांत होती, तीच आजच्या प्रसंगीं आहे. जितकें तें कार्य मंगल होतें तितकेंच आजचें कार्य ही मंगल आहे. त्यावेळीं अंतरपट सुटल्याबरोबर उभयतांची दृष्टीभेट होणार होती, त्याचप्रमाणें आज अग्नी प्रवेश केल्याबरोबर प्रियतमाची भेट आहे. तेव्हां आजचा दिवस लग्नसमारंभाचे आनंदापेक्षां मला यत्किंचित् ही कमी वाटत नाहीं. कारण हल्लींचा समागम हा चिरसमागम आहे. बाईसाहेब माझें आपल्याजवळ आतां इतकेंच मागणें आहे कीं, माझ्या ह्या अर्भकाचें आपण संरक्षण करा. मी जिवंतच आहें असें त्याला निरंतर वाटेल

अशा तऱ्हेनें वागवा; आणि हें शुभ कार्य लवकर उरकण्याची मला आज्ञा द्या.

सदाशिवराव—ताई, तुह्मीं आह्मांला सोडून जाऊनका. पंत तर आह्मांला टाकून गेलेच. त्यांचेवर आह्मां सर्वांची भिस्त होती आणि आतां तुह्मीं ही जातां ! आतां मी सल्ला मसलत कोणाची घेऊं ? माझ्या जिव्हाळ्याचा कोण आहे ? मी आपली हितगुजाची गोष्ट कोणाला सांगूं. पंत गेले ते गेले. आतां कितीजरी शोक केला, तरी ते परत येणार नाहींत. तुह्मीं तरी जाऊं नका. मी तुमच्या बाळाला सवाई बुंदेला करीन.

पार्वतीबाई—बाई, ऐकलत का इकडल सांगण काय आहे तें ? तुमची चित्तवृत्ती ह्यावेळीं ठिकाणीं नाहीं, तव्हां तें नीटसर लक्ष्यांत यावयाचें नाहीं. पण यावेळीं मीं तुह्मांला काय सल्ला द्यावी हें मलासुद्धां सुचत नाहीं ! ईश्वरा, सूर्यनारायणा, आज तूं अस्ताला जाण्याचे पूर्वीं काय काय करणार आहेस तें तुझें तुलाच माहित ! बाई, मी काय ह्मणतें हें तुह्मीं समजलांतना ?

सरस्वतीबाई—भाऊसाहेब, बाईसाहेब, ही वेळ अशी आहे कीं, ती कशी आहे यासंबंधीं विचार करीत बसणें ह्मणजे मानवी कर्तृत्वाला चुकण्यासारखें आहे. ज्याठिकाणीं माझें अंतःकरण गुंतून गेलें आहे, त्याठिकाणाहून त्याला मागें ओढण्याचा प्रयत्न करणें ह्मणजे खचित् माझ्या पूर्वजन्मींच्या पातकाचें फळ असलें पाहिजे.

आणि तसें जर नसेल तर मग, मग काय, जन्मलेल्या प्राण्याची आहुती काळमुखामध्यें हालअपेष्टेनें कधीं तरी पडणारच, त्यापेक्षां आज सहगमन करणें हें कोणाला अनुचित वाटेल ? इतका अज्ञान प्राणी आज या येथें जमलेल्या स्त्रीपुरुषांमध्यें कोणी असेल, असें मला वाटत नाहीं. मला आतां उगीच आग्रह करूं नका. बाईसाहेब जाऊंद्या मला. फार वेळ माझी वाट पाहणें होत आहे.

बाळकृष्णशास्त्री-ताई, पुत्रवतीला सहगमनविधि सशास्त्र नाहीं. मृतझालेला प्राणी पराधीन होऊन कर्मार्जित् भूमिला जातो; आणि सहगमन करणारी स्त्री, आत्महत्येचा दोष पदरीं बांधून अधोगतीला जाते. आत्महत्या करणाऱ्या स्त्रीच्या हातून कोणतेंही पुण्य घडत नाहीं. यामागें पुष्कळ साध्वीस्त्रिया पतीमागें सती गेल्यावांचून राहिल्या आहेत. त्याप्रमाणें तुह्मींही आपल्या पुत्राचें पालन करून रहा.

सरस्वतीबाई-शास्त्रीबुवा, आपण ह्मणतां तें कदाचित् खरें असेल; परंतु शास्त्र आणि पुराणें यांचा विचार करण्याची शक्ती आतां मला राहिली नाहीं. आतां माझी शक्ती ह्मणजे प्रीति ! आणि ज्यांच्या विषयीं ती आहे त्यांच्याचकडे ती ओढ घेत आहे. तेव्हां इथें शास्त्रांचा उपयोग होणेंच शक्य नाहीं. आणखी मी म्हणत कीं, निरंतर त्यांच्याच सहवासामध्यें असावें ही माझी

उत्कट इच्छा आहे. तर तुह्मीं कोणी मला अटकाव करणें ह्मणजे तुह्मीं पातकाला अधिकारी होतां. नाहींग बाई, मी स्वतः पाप करायची नाहीं, आणि माझ्या समक्ष कोणाला करूंही द्यावयाची नाहीं. (वर पाहून) थांबा ! आलेंहो आलें.

बाळासाहेब—आई, बाबा मला सोडून गेले आणि तूंही जातें ह्मणतेस तर मलाही बरोबर घेऊन चल. आतां माझें संगोपन कोण करील ? आतां बाबा तर नाहींतच आणि तूंही चाललीस. मग मी आतां कोणाच्या आश्रयानें दिवस काढूं ? ('आई आई' ह्मणून रडूं लागतो.)

सरस्वतीबाई—(त्यास जवळ घेऊन) बाळा, रडूं नाहीं असें. उगा रहा. तूं कांहीं काळजी करूं नको. ईश्वर तुझा सांभाळ करील. तो तुझें कांहींएक उणें पडूं देणार नाहीं. शिवाय माझ्यामागें आपले अन्नदाते, माझे धर्माचे बंधू, भाऊसाहेब, तुझे मामा तुला आहेतच. ते तुझे सारे लाड पुरवितील. (वडील माणसांना नमस्कार करून) भाऊ, तुमचें मजवर सख्याभावाप्रमाणें प्रेम आहे, असेंच माझ्या बाळावर ठेवून त्याचा सांभाळ करा. (नंतर पार्वतीबाईकडे वळून) बाईसाहेब, आपल्याजवळ पदर पसरून असें मागणें मागतें कीं, हा आतां माझा मुलगा नव्हे. आपला आहे. तुम्हीं दोघेजण त्याला आतां पदरांत घ्या. माझा ह्याला विसर पाडा. या शुभकृत्याला अधिक उशीर लावणें ह्मणजे,

तुह्मां सर्व स्वकीयांना अधिक वेळपर्यंत दुःखांत ठेवणें आहे. ह्मणून ह्मणतें, आतां कृपा करून निरोप द्या.

पार्वतीबाई—ताई, तुह्मीं आह्मांला सोडून चाललांतच. आतां बाळासाहेबाची तुह्मीं कांहीं काळजी करूं नका. ईश्वर त्याला उदंड आउक्ष्य देईल. बाई, तुमच्या ह्या पवित्र इच्छेच्या आड येणें आह्मांला उचित् वाटत नाहीं. ईश्वर तुमच्या मुलाला निरंतर सुखांत ठेवील; आणि स्वर्गलोकीं तुह्मां उभयतांना अखंड सौख्याचा लाभ देईल. या प्रसंगीं मी अधिक काय बरं सांगूं.

सरस्वतीबाई—बाळा, तूं कांहीं काळजी करूं नकोस. भाऊसाहेब मामा तुला कांहींएक कमी पडूं देणार नाहींत. समजलास, जा आतां त्यांच्याकडे. तुझ्या वडिलाची स्वामीसेवा मनांत आणून त्यांच्या सवाईनें तुला बनवीन असें अश्वासन प्रत्यक्ष तुझ्या धन्याकडून मिळालें असून मग आणखी जास्त आश्रय कोणाचा पाहिजे?

बाळा—आई, बाबा तर मला टाकून गेले; आणि तूंही गेल्यावर जगामध्यें मला प्रियवस्तु कोणती रहाणार? देवा, या इतक्या लहान वयामध्यें माझ्यावर तूं हा काय प्रसंग आणलास! [आईच्या गळ्याला मिठी मारतो.]

सरस्वतीबाई—बाईसाहेब, हा आपला मुलगा. विना-कारण मला बिलगतो आहे. आतां याचा माझा काय संबंध राहिला आहे? हा आपला आपण सांभाळा. (वर पाहून) अहाहा! तें पाहिलें का! काय बरें तें!

होय विमानच ! प्रियाची मूर्ती त्यामध्यें बसलेली आहे. मला हातानें लवकर ये ह्मणून खुणावीत आहेत. बाईसाहेब, आतां मला कोणीही विलंब करूं नका. जाऊंद्या मला.

सदाशिवराव--जर तुमचा सहगमनाचा पूर्ण निश्चय आहे, तर या धर्मकार्याला आड येणें मला उचित् नाहीं. ईश्वर तुह्मांला बुद्धी देईल तसें तुह्मीं करा. (कपाळावर हात ठेवून स्तब्ध उभा रहातो.)

सरस्वतीबाई—प्रिया, आपण मला विमानांत बसलेले समोर दिसतां आहां ! साररुया हांका कां बर मारतां? ही पहा मी आलेंच. (पार्वतीस) बाईसाहेब, संभाळा याला. बाळा जा आतां. माझ्यानं जास्त बोलवत नाहीं. भाऊसाहेब, बाईसाहेब, आपल्याला कांहीं सांगायचं होतं पण काय सांगायचं होतं तें सगळं मी विसरलें. प्रिया, (मोठ्यानें) ही पहा, आलें हो आलें. (पडदा पडतो.)

प्रवेश ४ था.

स्थळ--(पानिपत येथील होळकरांच्या तंबूचा रस्ता.)

[एक ब्राह्मण येतो.]

ब्राह्मण—दैवाची गती किती विचित्र आहे ! मराठे गिलच्यावर स्वारी करणार आहेत तेव्हां ह्मटलें यावेळीं बाजा-

खुणग्यामध्यें सामील होऊन, पेशव्यांचा आश्रय मिळवून, आपल्या कुटुंबाचें कल्याण करून घेऊं. याहेतुनें मी इकडे हिंदुस्थानांत आलों. आग्रे मुक्कामीं सुभेदार मल्हारराव होळकर यांनीं आपल्या आश्रयाला मला ठेवून घेतलें. तेव्हां मला वाटलें आपण ज्या हेतुनें आलों तो हेतु सफल झाला. पण होळकरसाहेबांनीं आह्मांला सुजाउद्दौल्याचे जासूद बनवून ठेविले. स्नानसंध्येलासुद्धां वेळ मिळत नाहीं. पण आतां करायचें काय? प्रसंगांत सांपडलों आहों. त्यांतून निभाऊन गेलें पाहिजे. आज सुजाउद्दौल्यानें दिलेलें हें पत्र आणि तोंडीं सांगितलेला निरोप, सुभेदारांना कळवून, मार्ग सुचेल तिकडे निघून जावें. पेशव्यांना जाऊन मिळाल्यास मल्हारराव होळकर मला जिवंत ठेवणार नाहींत. अगर तो हिंदु ह्मणून कदाचित् मला कैद करून ठेवील; परंतु सुजाउद्दौला मला देहान्त प्रायश्चित दिल्यावांचून कधींही राहणार नाहीं. तेव्हां ठरला हाच बेत कायम. ही कामगिरी बजावल्यानंतर वाट सुचेल तिकडे जावें. आतां आंत जाऊन सुभेदारसाहेबांना हें पत्र देऊन निरोपही कळवावा ह्मणजे झालें. (जातो.)

प्रवेश ५.

(स्थळ--पानिपतचें मैदान.)

(मल्हारराव होळकर बसले आहेत. जवळ चाकर उभे आहेत असा पडदा उघडतो.)

चाकर--सुभेदारसाहेब, बाहेर कोणीएक ब्राह्मण

आला आहे. तो आपल्या भेटीची इच्छा करीत आहे. त्याला आंत घेऊन येऊं का ?

मल्हारराव—जा. त्याला आंत पाठवून दे; आणि तुम्हीं सगळेजण बाहेर जा. (सगळे बाहेर जातात. ब्राह्मण येतो त्यास पाहून) कां भटजी, काय खबर ?

ब्राह्मण—सुभेदारसाहेब, हें आपणास सुजाउद्दौल्यानें पत्र दिलें आहे. (पत्र घेऊन होळकर तें जवळ असलेल्या शेगडींत फेकून देतात.)

मल्हारराव—असल्या चिठ्याचपाट्या मजकडे पाठवीत जाऊं नकोस म्हणून सुजाउद्दौल्याला पुष्कळ वेळां सांगितलें होतें. पण तो आपली खोड टाकीत नाहीं. मला चांगलें वाचतां येत नाहीं आणि त्या कारकुना कडून वाचविल्या तर गुप्त गोष्टी बाहेर फुटतात. कोणाचा विश्वास धरावा ? त्या मधल्या-मधेंच पकडल्या गेल्या तर अर्थाचा अनर्थ होण्यास उशीर लागणार नाहीं. पण चिठ्याचपाट्यांचें प्रयोजन काय ? मनें साफ असलीं ह्मणजे झालें. त्याचा तोंडीं निरोप काय आहे तेवढा सांग.

ब्राह्मण—सुजाउद्दौल्याचा तोंडीं निरोप निराळाच आहे. परंतु खातरीसाठीं ही चिठी दिली होती. तिजवर त्यांची सही नव्हती.

मल्हारराव—आग लाव त्या खातरीला. एखादे वेळेस हीच खात्री चोहोंकडे भडका उडवून देईल. बरेंपण निरोप काय आहे ?

ब्राह्मण--सरकार, शेवटचा प्रसंग नजीक येऊन ठेपला आहे. तुह्मीं आम्हीं जुने दोस्त- तेव्हां आपल्या करारा प्रमाणें विश्वास ठेवावा कीं नाहीं, असें त्यानें विचारलें आहे.

मल्हारराव--सुजाउद्दौल्याचा मजवरचा विश्वास उडाला काय! असें व्हावें तरी कसें! मजवर भाऊसाहेबांचा रोष आहे. त्यांचा मजवर विश्वास राहिला नाहीं. त्यांजकडून माझा उपमर्द होत आहे. इब्राहिमखानगारदीच्या नादीं लागून माझा पाणउताराही केला. बळवंतराव मेहेंदळे हा कालचा पोर. माझा वडील मान मुळींच ठेवीत नाहीं. माझ्या पश्चात् नव्हे, पण तोंडावरही माझा पाणउतारा करतो; इतक्या जरी गोष्टी आहेत, तरी उघडपणें मला मदत करतां येणार नाहीं, तूं मात्र माझा विश्वासघात करूं नको असा त्यास निरोप सांग.

ब्राह्मण--ठीक आहे, जशी आपली आज्ञा. (जातो)

तिसरा अंक समाप्त.

अंक ४ था.

प्रवेश १.

स्थळ--पानिपत येथील मैदान.

(सदाशिवराव, विश्वासराव, शिंदे, होळकर, बळवंतराव वगैरे सरदार बसले आहेत असा पडदा उघडतो.)

सदाशिवराव--आतां कोणी बोलावणें केल्यापैकीं यावयाचे राहिले नाहीं ना?

विश्वासराव--महादजीबाबा शिवाय सर्व आले आहेत.

जनकोजी--ते इकडेच यावयाला निघाले होते. येतील इतक्यांत.

सदाशिवराव--ते नसले तरी आपण त्यांच्याच ठिकाणीं आहांत. आज मीं आपणा सर्वांना कां बोलाविलें आहे, हें बहुतेक अंशीं समजलेंच आहे आपली जिकडे तिकडे पिछे-हाट होऊन पाय पुढें न पडतां मागेंच येत चालला आहे. हीं चिन्हें चांगलीं नाहींत. तेव्हां आतां पुढें काय करावयाचें ?

मल्हारराव--(एकीकडे) आतां कुठे डोळे उघडत चालले आहेत. (मोठ्यानें) श्रीमंतांना सल्ला देऊन आज सुमारें सहा महिने झाले, पण तिकडे लक्ष्य देतो कोण ? बरोबरच आहे घरचा धनगर घरचीं मेंढरें वळावयाला उपयोगीं पडत नाहीं, त्याला बाहेरचाच पहावा लागतो.

बळवंतराव--काकासाहेब, कधीं कधीं घरचा धनगर धोपट मार्ग सोडून, आडवाटेला जाऊं लागतो त्या वेळीं त्याला दुसऱ्या मनुष्याला वाट विचारावी लागते. आज मितीस आपली स्थिती अशीच झाली आहे.

इब्राहिमखान--जब्के दुरानीफौज यमुना नदिके पैल उतरके आये, उसी वख्तको उसको पीछे हटाना जरूर था.

मल्हारराव--खानसाहेब, तुह्मीं त्यावेळेस तेथें नसतां, आणि भाऊसाहेब जर माझ्याच सल्ल्यानें चालते,तर तुह्मांकडे भरतपूरचा किंवा दिल्लीकडचा मार्गचा बंदोबस्त स्वतंत्रपणें सोंपला असता. मग आह्मीं शत्रूस पाहून घेतलें असतें.

समशेरबहादर–तरमग तुमच्या भालाईताच्या गनीमी काव्यानें कुंजपुरा तुमचे हातीं लागला असें तुमचें ह्मणणें आहे काय ?

मल्हारराव—कुंजपुरा तुमचे हातीं लागला ह्मणून कोणता मोठा पराक्रम केलात ? तुह्मीं गिलच्यांचा लाहोराला जाण्याचा रस्ता अडविला, तसा त्यानें ही तुमचा दक्षिणेकडे जाण्याचा रस्ता अडवून धरला आहे. पण तुह्मांला त्यानें पानिपतचे कोपऱ्यांत खेचून टाकिलें आहे, हें कोठें तुमच्या आलें आहे लक्ष्यांत ?

इब्राहिमखान–सुभेदारसाहाब, सरकार तुमारे सलाहके मुऑफिक चलने लगे,और तुमोर कह्यनेके मुऑफिक सबलोगही बरताव करनेके लीये तय्यार हो गये. बखत्पे एकी ठिकाण पडे रहे. कभीलूटलाट करनेमे मशगूल हो रहे.बखत्पे आगे बढणा. बखत्को पीछे हटना. मगर एकभी मुकर्र् इत्तला हूवा नही. बस्स उसीका इह नतीजा तुमको मिलताहै. इस् बाबमें और क्यौं कायूहके लिये सताते? इस् बाबकू हम् जबाबदार नही हय्. जो कभी शिकस्त की चढाई करके दुष्मन्के उपर चले जाते, तो दूराणी यमुना नदीपार निकल जाता.मगर वह बात तो तुमने कीई नहीं आब सोंच करने में क्या हासलहै?

मल्हारराव—खानसाहेब, मी तुह्मांला स्पष्ट सांगतों कीं आमच्या फौजेला जी आजमितीस भागुबाईसारखी दशा आली आहे, ती तुमच्या आणि बळवंतरावच्यामुळेंच. आतां श्रीमंतांना बदसल्ला देऊन आमचा नायनाट करणार

कीं काय? माझें तर असें मत आहे कीं कुचाची नौबत करून आजच्याआज सर्वांनीं माघारें फिरावें आणि गारदीपलटण व आमचे रणशूर बळवंतराव यांना हवेतसें नाचू द्यावें. कारण ते श्रीमंत सदाशिवरावभाऊंचे सख्खे शालक आहेत, ह्मणून त्यांना जय मिळालाच पाहिजे.

बळवंतराव—(उठून) माझें मेव्हण्याचें नातें घरांत. लढाईवर मी त्या नात्यानें आलों नाहीं, आणि याउपर सर्व सरदारांना आणि आपल्या जाबुवंतबुवांना मी नकोसा असेन तर ह्या दरबारांत माझी बसण्याची इच्छा नाहीं.

त्रिंचूरकर—(बळवंतरावाचा हात धरून बसवितात.) बळवंतराव, आपण ज्यावेळीं एकमेकांच्या उखाळ्यापाखाळ्या काढतां त्यावेळीं मी अगदीं स्तब्ध असतों. नाईलाज होतो त्यावेळेलाच जिव्हेला चलन देतों. इतका वेळपर्यंत या दरबारांत चाललेला सर्व प्रकार ऐकून माझ्याच्यानें राहवेना ह्मणून आतां बोलतों. बळवंतराव आपल्यावर प्रसंग कोणता आहे याचा विचार करा. चुकी तुमची असेल ! माझी असेल ! श्रीमंतांची असेल ! किंवा मल्हारराव होळकरही चुकत असतील. पण सांप्रत आह्मी सर्व यवनांच्या चक्रव्यूहामधें सांपडलों आहों. या संकटसमयीं मराठ्यांच्या गादीचें यश आपण सर्वांनीं मिळून राखिलें पाहिजे. आपणा सर्वांच्या आहुती रणयज्ञांत पडल्यातरी बेहत्तर आहे. पण मागें निदान एक शिपाई तरी यशाची वार्ता घेऊन पुण्यास गेला पाहिजे, ह्मणजे नानासाहेबांना, आपल्या सर्व स्वकीयांना, इतकेंच नव्हे तर सर्व महारा

ष्ट्राला, प्रत्येक हिंदुला, आपली निधनवार्ता ऐकून आनंदच होईल. ज्यास्त काय बोलूं आणि बोलतांही येत नाहीं, माझा कंठ स्वामिभक्ती आणि देशभक्ती या दोन कट्यारी दोहींकडून शिरल्यामुळें दाटून आला आहे. (डोळे पुसतो)

इब्राहिमखान--(रागानें मिशावरून हात फिरवून) सुभेदारसाहाब, मैं कुरानकि कसम लेके कह्यता हूं के, पेशवेके फौजमेंसे कोईभी हमकू छोडके दुष्मन्के हवाले करके भग जायंगे, उन्के उपर मैं आपने तोफोंका मारा करूंगा. और उन्को मेरे दुष्मन् समजके उनका धुंवा उडाये बिना मैं कभी रहनेका नहीं. मोत सबके तखदीर में लिखी है, किसीकोभी वह टलनेवाली नहीं है. मैं नेकजाद् हूं औरमुसलमीनोंके मुऑफिक दगलबाज नहीं हूं.

सदाशिवराव—काकासाहेब, अहो खानसाहेब, तुह्मी आहां कोठें ! करतां काय ! अशा प्रसंगीं हें वर्तन चांगलें नाहीं ! ज्या गोष्टी होऊं नयेत त्या आमच्या प्राक्तनानें झाल्या. त्या कोणाकडून ही होवोत. पण त्याचा वाद आतां काय उपयोगाचा ? मागील उखाळ्यापाखाळ्या काढीत बसण्यांत काय फायदा ? आपणास जय मिळेल अशी ईर्षा धरून एकदिलानें लढलें पाहिजे. त्यांतच भूषण आहे.

बळवंतराव—श्रीमंत, सर्व सरदार हो, आतां हा बळवंतराव मेहेंदळे भाऊसाहेबांचा शालक नव्हे.तुह्मां महाराष्ट्रीयांपैकीं एक सरदार, छेः तुमचा एक प्रजाजन म्हणून सांगतो

प्रथमतः यवनावर चढाई मी करणार. शिकस्तीनें लढणार. यश आलें तर ठीक आहे. नाहींपेक्षां रणांगणीं देह ठेवणार; पश्चात् माझ्या कबिल्याचें तुह्मीं सर्वांनीं संरक्षण करावें. मला आतां अधिक बोलवत नाहीं. (इतक्यांत महादजी शिंदे येतात)

महादजी—(मुजराकरून) श्रीमंत, सर्व सरदारहो, शत्रू अगदीं अंगावर येऊन भिडला आहे. त्यानें आपणास चारी बाजूनें अडवून धरलें आहे. दाणावैरण लुटून नेला आहे. शिवाय ठिकाठिकाणीं आपले लोकांस कापून काढीत आहे. अशावेळीं त्याच्याशीं दोन हात झालेच पाहिजेत. आपसांत यादवी काय कामाची ?

सदाशिवराव—सरदारहो, आपल्यावर आजच्या प्रसंगीं रणदेवतांचा क्षोभ झाला आहे. तेव्हां तुह्मां सर्वांस एवढेंच सांगणें आहे कीं, आपण द्वेषभाव व मत्सरबुद्धी टाकून एकदिलानें लढण्यास तयार व्हा. यवनांचे बळी देऊन क्षुब्ध झालेल्या देवतांना शांत करा. सुरजमल्लजाट तर अशा प्रसंगीं आपणांस सोडून गेला आहे. त्याचाही नीट विचार केला पाहिजे.

मल्हारराव—श्रीमंत, जाट गेला तर गेला त्याची तरी कशाला हवी इतकी मातब्बरी!

बळवंतराव—श्रीमंत ह्मणतात तेंच खरें. जाटांनीं असा विश्वासघात केला त्याचा चांगलाच समाचार घेऊं, आपण कांहीं काळजी करूं नये. आतां निकराची लढाई केल्याशिवाय आपणाला मार्गच नाहीं.

महादजी—जे सरदार या घडीस लढण्यास तयार असतील त्यांच्याबरोबर निघण्यास माझी ही तयारीच आहे. हुकूम मात्र व्हावा. यावेळेस आपणासमोर मृत्यू व विजय असे दोघे मूर्तिमत उभे आहेत मृत्यूच्या जबड्यांत सांपडण्याचा प्रसंग आला तरी शत्रूस पाठ दाखवूं नका. मारूं किंवा मरूं अशा दृढनिश्चयानें लढा. हा मी तयारच आहें.

बळवंतराव—श्रीमंताची जर इच्छा असली तर शत्रूवर छापा घालण्याची माझी तयारी आहे.

सदाशिवराव—ठीक आहे. बळवंतराव, तुमची जर मर्जी आहे तर करा तयारी. तुह्मीं आज छावणीच्या उत्तरेच्या बाजूनें बाहेर पडा. (समशेरबहाद्दरकडे पाहून) समशेरबहाद्दर तुह्मीं बळवंतरावाच्या फौजेपासून पाव कोसाच्या अंतरानें मागें राहून पिछाडी संभाळा. बादशहा बिछान्यांतून उठला नाहीं तोंच त्याच्या भोंवताली गराडा घाला. बिचव्यांत तो नसला तर त्याच्या फौजेचा चेंदामेंदा करून टाका, आणि तो असेल त्या ठिकाणीं गांठून त्याला कैद करा. इतर सरदारांनीं त्याचा अतईखान सरदार रणस्तंभाच्या डाव्या अंगाला पांच सात हजार स्वारांनिशीं रोज पहारा करीत असतो त्याला अकस्मात् गाठून त्याची फौज कापून काढावी. बळवंतरावाचा ईषारा होतांच सर्वत्रांनीं बाहेर पडावें. चला आतां, आपआपलें काम कोण कसें करतो तें पाहणें आहे. (चोपदाराकडे पाहतो.)

चोपदार—कचेरी बरखास्त. (जातात.)

प्रवेश २.

(मल्हारराव--एकटेच बसले आहेत.)

मल्हारराव--(आपल्याशींच) एकंदरींत भाऊसाहेबांचा बेत त्या सुरजमल्ल जाटाला लुटून ठार मारण्याचा आहे! ज्याच्याशीं आमच्या आणाभाका झाल्या त्याच्या विषयीं हे विचार! बरं पाहून घेऊं त्याला हे कसे मारतात ते. गाजुद्दीनखानाला दिल्लीची वजिरात देण्याविषयीं सुचविलें तर तेंही पसंत नाहीं. भाऊसाहेबांची इच्छा विश्वासरावास दिल्लीचे तख्तावर बसवून सुजाउद्दौल्यास दिल्लीचा वजिरात देण्याविषयीं होती. पण अखेर तोही बेत फसला. शिवाय दिल्लीच्या खजिन्यावर ह्यांची नजर आहेच. तख्तावरील छद फोडून ह्यांची तृप्ती झाली नाहीं, त्याचें नाणें पाडिलें तों अवघे तीन लक्ष रुपये भरले. दिल्लीचे तख्तावरील छद काढूं नका तुह्मांला पैशाची अडचण असली तर मी पांच लक्ष रुपये रोख देतों असें सुरजमल्ल जाट ह्मणत असतां त्याचें ऐकिलें नाहीं. बरं ऐकलें नाहीं तर नाहींच पण उलट त्याला ठार मारण्याचा बेत! वः फार चांगलें. (चाकर येतो)

चाकर—बाहेर सुरजमल्लजाट आपल्या भेटीची इच्छा करीत आहेत.

मल्हारराव—जा त्यांना घेऊन ये.

चाकर--जी सरकार. (जातो व जाटासह येतो.)

मल्हारराव—या तुह्मीं सुरजमल्ल, बरें अगदीं वेळेवर आलांत.

सुरजमल्ल — आपला निरोप पोंहचतांच आलों. कां, पण इतके घाईनें कां बोलावलें ?

मल्हारराव—अहो तसंच कांहीं काम आहे. (चाकरा कडे पाहून) अरे तूं बाहेर उभा रहा. कोणी मला भेट-ण्यास आले तर मी वाड्यांत नाहीं ह्मणून सांग समजलास का !

चाकर--जी सरकार (जातो)

मल्हारराव—हें पहा सुरजमल्ल, तुह्मीं भर कचेरींतून उठून गेलांत त्याबद्दल बळवंतरावाना राग आला आहे. त्यांनीं तुमच्या नाहीं नाहीं त्या कुचेष्टा केल्या व त्याला श्रीमंतांनीं माना डोलावल्या. एकंदरींत सगळाच पोरखेळ.

सुरजमल्ल—मला वाटलेंच होतें आपल्यामागें कांहीं कुचेष्टा होतील ह्मणून

मल्हारराव—अहो नुसत्या कुचेष्टाच काय घेऊन बसलांत त्यांचे विचार फार भयंकर आहेत.

सुरजमल्ल—खरेंच कीं काय !

मल्हारराव—अहो नुसत्या कुचेष्टा नव्हेत. त्यांनीं तुमचा गोट लुटून तुह्मांला कैद करण्याचा घाट घातला आहे. बहुतकरून ते आजच तुमच्यावर छापा घालतील.

सुरजमल्ल—काय ह्मणतां? मग तर गोष्ट अगदींच निकरावर येऊन ठेपली ह्मणावयाची, ह्याला आतां कांहीं तोड ?

मल्हारराव—तोड काय तुह्मीं आतांच्या आतां कोठें तरी निघून गेलें पाहिजे. मग पाहूं पुढची व्यवस्था.

सुरजमल्ल--काकासाहेब, बरोबर अवजड सामान आहे. तेव्हां आजच्या आज कसें जाववेल ?

मल्हारराव—मी सांगतों ऐका. असा धीर सोडून कांहीं चालायचें नाहीं. तुमच्याबरोबर जें नेण्यासारखें सामान असेल तें घेऊन संबळगडावर जा. तेथें पोंहच-ल्याबरोबर इशाऱ्याची तोफ करा. वाटेनें अगदीं गडबड करूं नका. यदाकदाचित् ही गोष्ट भाऊसाहेबांस अगर बळवंतराव यांस कळली तर ते तुमच्यावर छापा घालण्यास येतील, त्यांचो मी वाटेंत कुचंबणी करीन, इतक्यांत तुह्मीं पार व्हा ह्मणजे झालें. कां कसा दिसतोय बेत ?

सुरजमल—काकासाहेब, आपले मजवर अनंत उपकार आहेत. ते मी कधींही विसरणार नाहीं. पेशव्यांची इतके दिवस नेकीनें आणि इभ्रतीनें नोकरी बजाऊन अखेर हा परिणाम व्हावा आं! थोडी सरशी झाली नाहीं, तोंच यांनीं चढून जाऊन, अंगावर चढेलल्या निशेंत माझा असा शेवट करण्याचा विचार करावा आं! रघुनाथरावांनीं जेवढ्या म्हणून उत्तरहिंदुस्थानांत स्वाऱ्या केल्या, त्या त्या वेळीं त्यांनीं माझीच सल्ला घेतली होती. त्याच रघुनाथरावाच्या बंधूनीं मजविषयीं असा विचार करावा आं! आतां मी तर संबळगडावर जाऊन स्वस्थ बसणार. पण काकासाहेब, हा अहमदशहा दुराणी, भाऊसाहेबांच्या धुंद झालेल्या नेत्रांत चांगलेच अंजन घालील, व त्यांचा नकशाही खालीं उतरील. मी घेतों आतां आपली रजा. पुढच्या तयारीस लागलें पाहिजे.

मल्हारराव—जा, नीट संभाळून जा. (जाट जातो) आतां बळवंतराव व आमचे श्रीमंत जाटास कसे कैद कर-

तात ते पाहूं. जाट तर हातावर तुरी देऊन गेलाच. आतां आपल्याला पण पुढील कामास लागलें पाहिजे. (जातो)

प्रवेश ३.

(स्थळ--पानिपत येथील सदाशिवरावभाऊच्या तंबू बाहेरील जागा.)

(सदाशिवरावभाऊ व विश्वासराव.)

सदाशिवराव—विश्वासराया, सध्यां आपणांस जय मिळावा अशी ईश्वरेच्छा दिसत नाहीं. मग माझी चूक असो, मंडळीची असो किंवा आमच्या खडतर प्राक्तनानें सर्वांच्याच बुद्धीला भ्रम झालेला असो. पण ह्या खेपेस यश येईल असें वाटत नाहीं. आपणांस सध्यां बाहेरून मोठी कुमक आल्याशिवाय येथून नीट सुटका होत नाहीं. दक्षिणेंतून सैन्य येऊन वेळेवर मदत मिळेल अशी आशातर नकोच. मला जास्त फौजेची जरूर लागणार नाहीं अशी मी नानासाहेबापाशीं प्रतिज्ञा करून निघालों आहें. त्याच तोंडानें मदत करा असें मी कधीं ह्मणणार नाही. जें होणें असेल तें होईल. पण मला अतीशय दु:ख हें वाटत आहे कीं आग्रहाला पडून बाळा, तुला आपल्या बरोबर आणला या संकटांत तुझें संरक्षण कसें होईल या काळजी मुळें जणूं काय माझ्या काळजाला हजारों विंचू चावताहेत असें मला वाटतें. काय परमेश्वर करील तें खरें.

विश्वासराव—भाऊसाहेब, माझ्या जिवाची मला काळजी वाटत नाहीं. वास्तविक पाहतां हा प्रसंग तुह्मांवरच अधिक आहे. तिकडे नानासाहेबांना या घोर प्रसंगाची

वार्ता कळली असली तर त्यांना एक क्षणभर देखील चैन पडावयाचें नाहीं. असें तुम्हां दोघां बंधूचें प्रेम आहे.

सदाशिवराव—अरे, नानासाहेबांचा व वहिनीचा तुझ्यावर सर्वांपेक्षां अधिक लोभ शिवाय तुझा ओढा माझ्या कडे जास्त. ह्मणून तुला त्यांनीं मजबरोबर पाठविलें व तूंही मोठ्या उत्सुकतेनें आलास; पण एकंदर गोष्टीचा शेवट चांगला होईल असें मात्र मला वाटत नाहीं. बाळा, तुझें वय लहान, तूं अझून कोणत्याही प्रकारचे वैभव भोगले नाहींस. सगळ्या मुलांमध्यें तुजवर आमची ममता विशेष, असें असतां हें अपयश माझ्या वाट्याला आलेंना ! (डोळ्यांतून पाणी येतें.) विश्वासा, तुला मृत्यूच्या गुहेंत आणून सोडण्याला मी कारण झालोंना ? गोष्ट माझ्या हातूनसर्वतोपरी घसरली. आतां त्याला काय इलाज आहे

विश्वासराव—भाऊसाहेब अखेरीस तुमच्यावर बेतलीच तर हें काळें तोंड घेऊन, मी दक्षिणेंत नानासाहेबाकडे माघारा जाणार नाहीं. हें खचित् समजा. जिवांतजीव आहे तोंपर्यंत तुमचें साह्य करीन. दुर्दैवानें यश नाहींच आलें तर रणांगणीं पडून किर्ती मिळवीन. आपण कोणत्याही प्रकारें खेद करू नका. (शागीर्द येतो.)

शागीर्द—श्रीमंत, वेळ बराच झाला आहे. स्नानाचें पाणी तयार आहे. मग जशी आपली आज्ञा.

सदाशिवराव—हां, चल आलों. विश्वासा, तुझें स्नान झालें का ?

विश्वासराव— माझें स्नान सकाळींच झालें आहे.

सदाशिवराव—बरें तर, मी जातों स्नानाला. (शागीर्दाकडे पाहून) चल, बराच उशीर झाला आहे.(जातो.)

विश्वासराव--(आपल्याशींच) प्रस्तुतचा प्रसंग फार कठीण आला आहे. भाऊसाहेब तर हट्टास पेटले आहेत आतां आपणच मुकाट्यानें नानासाहेबास पत्र पाठवून मदत मागावी. त्याशिवाय दुसरा उपाय नाहीं. (विचार करून) हो, असेंच खरें. दुसरा मार्गच नाहीं. (दाराकडे पाहून) कोण आहेरे तिकडे, माझें कलमदान घेऊन ये.

चाकर—(येऊन) हें घ्यावें सरकार. (जातो. विश्वासराव पत्र लिहीतो. पत्र पुरें झाल्यावर)

विश्वासराव—कोण आहे रे बाहेर ?

चाकर—(येऊन) काय पाहिजे सरकार ?

विश्वासराव--अरे, माझ्या स्वारांपैकीं सांडणीस्वारांचा हैबतराव नाईक आहे, त्याला घेऊन ये. जा.

चाकर--जी सरकार. (जातो. व हैबतरावाला घेऊन येतो त्यास पाहून)

विश्वासराव--हैबतराव, तुह्मीं माझे विश्वासू नोकर ह्मणून तुह्मांला एक कामगिरी सांगतों, कराल ना ?

हैबती—रावसाहेब, हुकूमाची खोटी, आपल्या करितां शीर देखील देईन. मग इतर गोष्टीची काय कथा

विश्वासराव—बरं तर ऐका. हें मोहोरबंद पत्र घेऊन तुह्मीं दक्षिणेंत जा व कोणास न कळतां नानासाहेबापाशी नेऊन द्या, काय समजलांत ?

हैबती—ठीक आहे. आपण काळजी करूं नये. मीच स्वतः नानासाहेबास नेऊन देतों.

विश्वासराव--हैबतराव, कामगिरी फार नाजुक आहे, नीट झाली पाहिजे हो.

हैबती--आपण मजवर विश्वास ठेविलात आतां त्याची काळजी करूं नये. बरें तर मी घेतों रजा.

विश्वासराव--जा. नीट संभाळा. (जातो.)

(पडदा पडतो.)

प्रवेश ४ था.

स्थळ-पानिपत येथील मराठ्यांच्या छावणी-पुढील मैदान.

(जनकोजी येतो.)

जनकोजी--काय चमत्कार आहे! जो नवा दिवस उगवतो तो मागच्या दिवसाला चांगला म्हणवितो. काय ही दुफळी माजून राहिली आहे! अशानें यश संपादनाची आशा बहुतेक नाहींशीच झाली! परवांचे दिवशीं मोठी भयंकर प्रतिज्ञा करून बळवंतरावानीं चढाई केली. परंतु केवळ आमचा उत्कर्ष होऊं नये ह्मणून ऐनवेळीं मुद्दाम बुद्धिपुरःसर कचखावून आपलें सैन्य मागें ठेविलें, त्यामुळें आमच्या हजारों लोकांची कत्तल झाली. मोठ्या आग्रहानें आह्मींच चढाई करणार म्हणून पुढें जाऊन बळवंतरावानें जें हें वर्तन केलें तें अत्यंत निंद्य केलें. प्रसंग तर असा आणीबाणीचा अशावेळीं भाऊसाहेब तर सर्वस्वी त्यांच्या

आधीन झाले आहेत. या प्रसंगीं आह्मीं शिंद्यानीं कोणती दिशा पतकरावी हाही प्रश्नच येऊन पडला आहे. काय करावें, कांहीं सुचत नाहीं ! (विचार करून,) यावेळीं दुसरा विचार काय करावयाचा ! मी तर आतां यवनांवर तुटून पडणार. मग काय होणें असेल तें होईल. आज संध्याकाळीं एकदां भाऊसाहेबांची गांठघेतों. त्यांनीं जरी मला पुढें जाण्याची आज्ञा दिली नाहीं तरी महादजी बावाच्या सल्यानें मी आपल्या फौजेचा मोर्चा यवनांवर चढविणार. हजारों मुसलमानांची कत्तल करून त्यांचा पाडाव करीन; मारीन किंवा मरेन परंतु उद्यांच्या प्रसंगीं माझ्या वडिलांच्या मरणाचा सूड घेतल्यावांचून मी राहणार नाहीं. किती ही बिकट स्थिती येऊन पोंहचली आहे ! अन्न गोड लागत नाहीं. स्वस्थ झोंपही येत नाहीं. किती दिवस आतां कुचंबत पडावें. छे, छे, मला आतां हें मुळींच सहन होत नाहीं. झाला माझा निश्चय. हाच कायम. (जातो.)

प्रवेश ५.

(बळवंतराव आपल्या तंबूत एकटे बसले आहेत.)

बळवंतराव—अरे, मी, बळवंतराव ह्मणजे कः पदार्थ आं ! शिंदे, होळकर आणि इतर मराठे सरदार हे कायते शहाणे ! आमच्या मस्तकांत मेंदु काय तो मुळींच नाहीं ! ईश्वरानें नुसता कापूस भरला आहे. असं या सर्वांना वाटतें काय ! या सर्व गर्वानें ताठून गेलेल्या सरदारांनीं माझा

अपमान केला नसता, तर मी चढाईच्या प्रसंगीं तलवार गाजवून दाखविली असती, काय हे मूर्ख लोक! वीराला प्रोत्साहन द्यायचें कीं त्याचा हिरमोड करायचा! यांनीं विनाकारण माझा हिरमोड केला. त्यामुळेंच केवळ माझ्या मनांत माघार घेण्याची कुकल्पना आली. पण आतां त्या गोष्टीचा विचार कशाला! झालेली गोष्ट तर परत येत नाहींच, आतां पुढें काय करायचें या गोष्टीचा आपण विचारच करूं नाहीं. आमचे जांबुवंतबुवा मल्हारराव होळकर सुभेदारसाहेब काय सांगतील, त्याप्रमाणेंच चालूं द्यावें, आणि गंमत पाहात स्वस्थ बसावें झालें. (इतक्यांत लक्ष्मीबाई येते.)

लक्ष्मीबाई—मघांपासून दरवाजा जवळ मी ऐकत उभी राहिलें आहें. आज हे काय विचार चालले आहेत! मी ह्मणतें, सर्व सरदारांच्या मसलतीच्या विरुद्ध आपण तरी कशाला जायाचें? नाहींपेक्षां गडे असेंच करावें, आपण उभयतांनीं आपल्या शिबंदीसह पुण्यास निघून जावें आणखी नानासाहेबांना इकडे या माजलेल्या दुफळीची सर्व हकीकत सांगावी. मग त्यांच्या इच्छेला येईल तसें ते करतील.

बळवंतराव—या युद्धाच्या कामांत बायकांना कांहीं समजतें का? त्यांची अकल चुली पुढें. माझ्यासारख्याला बुद्धिवाद करायला आपण नको आहांत. तुला काय वाटतें माझ्या अंगीं शूरत्व नाहीं? बिकट प्रसंगीं कसें धोरण ठेवावें हें समजत नाहीं? पण काय करावें, इथें हा सर्वच

मूर्खांचा बाजार माजला आहे. ह्मणून हल्लींच्या प्रसंगीं माझें कांहीं चालत नाहीं.

लक्ष्मीबाई–ह्मणूनच मी ह्मणतें कीं आपण पुण्याला जावें हें बरें. जर सगळे आपला द्वेष करितात, कोणालाही आपला उत्कर्ष सहन होत नाहीं, मग आपलें तरी इतकें काय अडलें आहे ! विनाकारण जिवावर संकट ओढून घ्यायचें. त्यापेक्षां सुखरूपपणीं पुण्यास जाणें चांगलें नव्हे कां ?

बळवंतराव––वः, आपल्या शहाणपणाची आतां तर कमालच झाली! तुला काय वाटतें हा बळवंतराव कांहींएक मर्दुमकी न करितां परत पुण्याला जाईल? छेः तें नांव सुद्धां काढूं नकोस. उदईक यवनांशीं प्रथमतः लगट मी करणार, मग त्या प्रसंगीं शत्रूचा पाडाव करून जय मिळवीन किंवा धारातीर्थीं देह ठेवून चिरकाल सौख्याचा लाभ मिळवीन. आमच्या पश्चात् तुह्मीं वाटेल त्याप्रमाणें वर्तन करा.

लक्ष्मीबाई–असं अभद्र काय ह्मणून बोलायचं तें ? माझी अशी कां इच्छा आहे कीं युद्धांत जय मिळूं नये ! आपली कीर्ती होऊं नये! आपल्याला जय मिळाल्यास मला किती समाधान ! किती थोरवी वाटेल बरं ! परवांचे प्रसंगीं आपल्या फौजेनें माघार घेतल्यामुळें सर्व बायांमधें माझी अगदीं नाचक्की झाली आहे. मला कोणी वर तोंड काढून देत नाहीं. पार्वतीवन्सं आपली सख्खीबहिणना !

त्यासुद्धां टोंचून बोलल्या, ह्मणून ह्मणतें जें काय करणें असेल तें विचारानें करावें. मीही आपलीच अर्धांगी आहें. ईश्वराच्या इच्छेप्रमाणें जर कांहीं वाईट गोष्ट झाली, तर आपल्या पश्चात् ही लक्ष्मी एक क्षणभर सुद्धां राहावयाची नाही. तावडतोब आपल्या सेवेकरितां सतीचें वाण घेऊन स्वर्गलोकीं हजरच आहे, असं समजा.

(गळ्याला मिठी मारते)

बळवंतराव—शाबास, आतां मात्र तुझें भाषण ऐकून मला अतीशय आनंद झाला आहे. मनउल्हासीत झालें आहे. वीरश्रीनें माझे बाहू कसें स्फुरण पावत आहेत. कंठ दाटून आला आहे. पुढें काय बोलावें हें सुचत नाहीं. प्रिये यवनांच्या प्रचंड सेनासागरापुढें मराठ्यांचा निभाव लागणें नाहीं. माझा देह उदईक धारातीर्थीं पडणार. यापुढें तुला योग्य दिसेल तें तूं कर. आतां माझ्यानें अधिक बोलवत नाहीं. (दासी येते.)

दासी—बाईसाहेब, भाऊसाहेबांकडून कोणी जासूद आला आहे.तो ह्मणतो श्रीमंतानीं सरकारास आतांचेआतां बोलाविलें आहे.

बळवंतराव—काय ,भाऊसाहेबांनीं आतांच्या आतां एवढ्या रात्रीं कां बरं बोलावणं पाठविलं असेल! उदईक मलाच लढाईवर जाण्यास सांगणार आणि माझा मनोगत हेतू सफळ होणार असें वाटतें. बरें आहे. मीं जरा जाऊन येतों. (दासीस) गंगे, मी येई पर्यंत तूं येथें रहा.

दासी— जी सरकार. (पडदा पडतो.)

अंक चवथा समाप्त.

अंक ५ वा.

प्रवेश १.

स्थळ——पानिपत येथील पेशव्यांचीछावणी,

(सदाशिवराव, विश्वासराव, जनकोजी, मल्हारराव होळकर वगैरे सरदार बसले आहेत.)

सदाशिवराव—काकासाहेब, ती दुःखदायक वार्ता समजल्यापासून बराचवेळपर्यंत मला खरीच वाटेना. मी बसल्याठिकाणीं थोडा वेळपर्यंत अगदीं स्तब्ध झालों. डाव्याबाजूला वळून पाहिलें तों कोणी स्त्री बसलेली होती. तिला ओळखण्याची मला शक्ती देखील नव्हती. थोडा वेळ स्तब्ध राहून निरखून पाहिलें तेव्हां समजलें कीं घरांतून हीं बसली आहे. उजवीकडे पाहतों तों मज प्रमाणें शोकानें व्याकूल झालेला विश्वास दिसला. त्यानें एकदम ओरडून मेहेंदळे परलोकवासी झाले! ही गोष्ट ईश्वराच्या इच्छेप्रमाणेंच घडली, आतां आपण खेद करूं नका. इतक्यांत आमच्या तंबूबाहेर मोठा गलबला ऐकूं आला. सर कार आज्ञा द्या सूड घेतों. फार वेळ झाला.ते ऐकून माझ्या मनाची तयारी झाली. विचार केला. अरे माझे शिपाई उत्कंठींत आणि एखाद्या अबले प्रमाणें शोकाकूल होऊन भान रहीत मी झालों हें काय! हरहर काकासाहेब,सर्व सरदारहो, बळवंतराव मेहेंदळे माझे आप्त,म्हणून त्यांच्या मृत्यूचे दुःख ज्यास्त, आणि दत्ताजी

शिंदे व गोविंदराव बुंदेले यांच्या संबंधें कमी, असें मुळींच नाहीं. हे तिघेही यवनांचे अनिष्ट ग्रह, केवळ, राहू, केतु, शनैश्वर नाहींसे झाले. ह्मणून ते चांडाळ मोठ्या आनंदांत असतील. आतां पुढला विचार जो कांहीं करणें आहे तो अखेरचाच करा. आतां अवधी राहिला नाहीं. तुह्मां सर्वत्रांना ठाऊक आहे कीं, श्रीकृष्णांनीं कौरव पांडवांच्या युद्धारंभीं याच कुरुक्षेत्रांत अर्जुनाला बोध केला, कीं, बा अर्जुना विजयी झालास तर तुझा यशोदुंदुभी सर्वत्र गाजेल व तुला राज्य प्राप्ती होईल आणि पतनपावलास तर मोक्षपद मिळेल. तेव्हां सरदार हो, तुह्मीं देखील हाच बोध लक्ष्यांत ठेऊन युद्धास आरंभ करा. तुह्मीं आतां लढाईचा केशरी पोशाख करून तयार व्हा.

जनकोजी—सरकारची आज्ञा आज तयारीची होत आहे! पण या जनकोजीची तयारी ज्या दिवशीं माझ्या काकाचा मृत्यू झाला आणि त्या नीच अविंधानें मरणोत्तर त्यांचा जो अपमान केला त्यावेळींच झालेली आहे. त्या समयीं माझा अगदीं नाईलाज होता. माझ्या उजव्या दंडात गोळी लागून घायाळ झालों ह्मणून, आणि कबिले सुरक्षित ठिकाणीं पोहचविण्या करितां कोटपुतळीस जाणें भाग पडलें होतें ह्मणून. नाहींपेक्षां खासास्वारी येण्याचे पूर्वींच या जनकोजीनें यवनांचा सूड घेतला असता. आतां तर निकराची वेळ येऊन पोंहचलीच आहे. सरकारस्वारींच्या इच्छे प्रमाणें सर्व सरदारांनीं एकदिलानें शत्रूची लांडगे-

तोड केली पाहिजे. मग जसा विचार होईल त्याप्रमाणें करावें. हा आपला पिढीजाद नोकर, जनकोजी, आतां दम धरणार नाहीं. आपल्या फौजेनिशीं शत्रूवर तुटून पडेल, आणि मग ईश्वरइच्छे प्रमाणें जें होणें असेल तें होईल.

मल्हारराव—श्रीमंत, आह्मीं आतां बुड्ढे झालों आमची साठीबुद्धिनाठी असेंच ह्मटलें पाहिजे. अलिकडची तरुणबांड मंडळी सल्ला देतील तीच खरी; ती जो मार्ग दाखवितील त्याच मार्गानें आह्मांला गेलें पाहिजे. वास्तविक पाहतां उद्यां घनघोर लढाईचा बेत होत आहे ही मोठी चूक आहे. आपण बोलूनचालून परकीय देशांत येऊन अडचणींत पडलों आहों. वास्तविक शत्रूला गनीमी काव्यानें जेरीस आणावयास पाहिजे. भाकर वीसकोसांवर जाऊन भाजावी, पुढें ती पंचवीस कोसांवर जाऊन खावी. अशी आपली छत्रपतीशिवाजीमहाराजापासून चालत आलेली पूर्वापार रीत, ती सोडून आपण महिनोगणती एकाच जागीं बसलों आहों. दिव्यावर पतंग उड्या घालतो तशा आपण उद्यां दुराणीवर घातल्या ह्मणजे पतंगाप्रमाणें स्थिती होणार; गनीमी काव्यानें शत्रूवर छापे घालून त्याला जेरीस आणावयास पाहिजे होतें. आह्मीं वाघ, सिंह, खरे, परंतु पिंजऱ्यांत सांपडलों आहों. तेव्हां श्रीमंतांची आज्ञा आह्माला मान्य असलीच पाहिजे.

विंचूरकर—काकासाहेब, आह्मां सर्वांचा भरंवसा काय तो आपणावर. आपणच जर असें निराशेचे उद्गार काढले तर लढाईचा शेवट गोड होईल असें मला वाटत नाहीं.

मल्हारराव—तें सर्व खरें, पण मला जें वाटलें तें मीं स्पष्ट सांगितलें, याबद्दल राग मानूं नये.

महादजी—श्रीमंतांच्या इच्छेप्रमाणें लढाई उद्यांच देऊन सोक्षमोक्ष करून घ्यावा. उद्यांच्या घनघोर युद्धामध्यें आम्हीं शिंदेमंडळी श्रीमंतांच्या पाठीवर राहून त्यांची पिछाडी संभाळूं.

समशेर—मीही खाशांच्या बरोबर राहून आह्मां मराठ्यांत आमच्या वाडवडिलांचें शौर्य कसें जागृत आहे तें दाखवीन.

मल्हारराव—तुह्मां सर्वत्रांची एकमतानें तयारी झाली आहे, तेव्हां माझा नाईलाज आहे. ज्याला जें योग्य दिसेल तें त्यानें करावें.

भाऊसाहेब—आतां सर्व सरदारांना माझी अशी आज्ञा आहे कीं, दुजाभाव सोडून मराठ्यांच्यागादीचें विमल यश संरक्षण करण्याकरितां नेटानें लढाई द्यावी. आतां दुसरा विचार करणें नाहीं. लढाईच्यावेळीं आह्मीं कबिले अंबारी मधून आमच्या शेजारींच ठेवणार. दैवानुसार अपयश आल्यास ईश्वराच्या इच्छेप्रमाणें त्यांची वाट लागेल. आह्मीं आतां कशाचीही पर्वा बाळगीत नाहीं. सरदार हो, तुह्मीं आतां आपआपल्या गोटांत जाऊन पहाटेस लढाईचा कर्णा होतांच छावणीच्या बाहेर पडा. गारदी, तुह्मीं आपला तोफखाना पुढें चालवा. गायकवाड, तुह्मीं त्यांची बाजू संभाळा. मोर्चेबंदीच्या तोफा जागच्याजागींच असूं द्या. विंचूरकर, तुह्मीं आपली फौज तोफांच्या मागून

चालवा. नंतर पागा घेऊन आह्मीं निघूं. इतर सर्व सरदारांनीं आमचे बरोबरच चालावें. त्यांच्यामागें होळकरांनीं आपली फौजे चालवून, सगळ्यांची पिछाडी शिंदे मंडळींनीं संभाळावी. अरब व इतर हत्यारबंद लोकांनीं मागें राहून छावणी संभाळावी. ईश्वर तुह्मां सर्वांना विजयी करो. चला आतां.

चोपदार—दरबार बरखास्त.

(जातात.)

प्रवेश २ रा.

स्थळ—पानिपतचें मैदान.

(इब्राहिमखान गारदी, जमादार, हवलदार व दफेदार बसले आहेत, असा पडदा उघडतो)

इब्राहिमखान—अय् नेक् जाद् रनशूर शिपाहिओ सरकार भाऊसाहाब के पिछे मैंय हमेशा यह तगादा रखताथा के, हमारे लोगोंका तनूखा बखत शीर चुकाते जाना, और उसीके लिये उन्का मेरे उपर फमालिका घुस्सा होताथा, और उस् तऱ्हांका मरुजा करना बहरक था. मैं तुम् सबोंसे इह फरमाता हूं के, आज दिन् तख्के मालिकका निमक हमने हराम किया नहि. इस् तऱ्हांकी उनकी खातरी कर देयंगे, उसी वख्तको मेरे दिलको आराम होगा. इस्लियें मैं तुम् सबोंसे कह्यता हूं के, तुम् रनसूरके बच्चे हो, तो फिर जिस् वख्तको आखरकी लढाई होगी उस् वख्त शिकस्तका हल्ला करके हम् नेकजाद् है, इह बाद आपने मालिक को खबर होगी, इस् तऱ्हांसे दुष्मनोकी कत्ल् करना चाहिये. आब मैं तुम् सबोंसे इह गुजारिष

करता हूं के औरता, और बालबच्चोंकी, आस् छोडदेना उन्के तरफ खुदाताला मेहेर नजर रखेगा, किसी बातकी हमारे तरफसे कुसूर होई ऐसा कोईभीं कह्यना न पावे. आपसे ये कह्यतां हूं के, मैं तो आज जानकी आस छोडके दुष्मनोके उपर बेषक चढाई करूंगा. जिस्के दिल्मे डर पैदा होती होगी उसीनें हमारे साथ आनेकी जरूरत नहीं है.

जमादार—खानसाहाब, हम् अपने जानकी बिलकुल आस् रखनेवाले नही है. दुष्मनोंको अपने भारी तोफोंके मारेसे काह्यल करदेयंगे. आप् फिकर करना जरूरत नहीं है.

हवलदार—जिस् बखत्को इनाज् और पैसेके सबब्से हम् बडे काह्यल होगये थें उस्वख्त हम् सबोंके दिल उखड गय थे मगर दहय्लीके तख्त उपरका चांदिका छद निकालके उसीके रुपये बनाये, और भाऊसाहाबने हम् सबोंका एक एक महिनेका तनखा चुका दिया उसवख्त हम् सबोंका दिल ठिकाने आया. और पहिले मुआफिक लढनेके वास्ते हम् लोगोंकी तय्यारी हुवी.

दफेदार—सरदारसाहाब, आपसें क्या कहूं, खुदाताला के रहेम नजरसे पहिला आफत्का वख्त जाता रहा है. और उह सबब्से हालको हम् बिलकुल डरते नहीं है. आपके होकोमके मुआफिक दुष्मनूके उपर कसालाकरके इनका धुंवा उडानेके वास्ते हमारी तय्यारी हय्, फकत हुकुम मिलनेकी देरी है.

इब्राहिम—अय् जवामर्दो तुम् सबोंकें मेरे दिल्के उल्फत्के मुआफिक लढनेकी तैय्यारी देख्के मै निहायत खुष हुवा हूं. और तुम् सबोंका अह्यसाल मानतां हूं. हालकों में इतजाही कहयतां हूं पेशवेका होनेकी बाद मेरे तरफसे जिस् तोर इषारत् मिले तुम् सबोंने लढना चाहिये. शिकस्तकी लढाई करना और अख्तान् पहूंचे तो दुष्मन् के साथ लढते लढते ही मरना. क्योंके हम् नेक जाद् निमकहलाल और खुद्खास लढवय्या पेसवा सदाशिवरावभाऊ उसीके लिये जान खैरात करना यही हम सबोंको मुनासीब है. अच्छा अभी चलो.

(जातात.)

प्रवेश ३ रा.

(पार्वतीबाई एकटीच बसली आहे असा पडदा उघडतो. इतक्यांत सदाशिवराव येतात, त्यांस पाहून पार्वतीबाई बाजूला उभी राहते.)

सदाशिवराव—कां, आज अशी खिन्न मुद्रा कां?

पार्वतीबाई—खिन्न कशानें झाली आहे. अलीकडे रात्रंदिवस कसें तें चैन नाहीं, झोंप लागत नाहीं, त्यामुळें तसें झालें असेल; आपल्याला रात्रंदिवस काळजी लागून राहिली आहे. तेव्हां आह्मांला कसें बरें वाटावें! सटवाजी तर ह्मणत होता कीं, उद्यां घनघोर लढाई होणार. उद्यां खरेंच कां लढाईवर जाणें व्हावयाचें?

सदाशिवराव—जी गोष्ट सर्वांना माहित झाली आहे ती तुझ्या पासून आतां कशाला लपवून ठेवूं. आज दरबारांत सर्वांनुमतें सूर्योदयापूर्वी गिलच्यावर स्वारीकरण्याचा निश्चय झाला आहे.

पार्वतीबाई—पण असं कशाला करायला पाहिजे? लढाई नाहींच केली आणि तह केला तर नाहीं कां चालायचं? गिलचे जबरदस्त आहेत ह्मणतात, मग आपले जीव धोक्यांत काय ह्मणून घालायचे?

सदाशिवराव—वाहवा! हीच का तुमची सल्ला आह्मांला? मी जो या मोहिमेवर निघालों तो गिलच्याबरोबर तह करण्यालाच का! मी गिल्लाच्यांना अटकेच्या पार लावून दिल्याशिवाय परत येणार नाहीं अशी नानासाहेबाबरोबर प्रतिज्ञा करून निघालों आहें, हें तुला माहित आहेना? बरं शत्रू जरी जोरावर असला तरी आह्मीं काय कमी आहों? दैव प्रतिकूल होऊन कांहीं विपरीत झालेंच —असें छत्रपतींच्या पुण्याईनें होणार नाहीं ह्मणा—तरी त्यांत काय झालें! तेंही एक प्रकारचें भूषणच आहे. व त्यांतच मोक्ष आहे. तुमचा सांभाळ मल्हारराव होळकरांकडे सोंपविला आहे. त्यांचें व सुजाउद्दौल्याचें चांगलें सख्य आहे. ते तुह्मांस नीट सुरक्षितपणें दक्षिणेंत पाठवून देतील.

पार्वतीबाई—(डोळ्यांत पाणी आणून) वः हे मात्र चांगले आपण सगळे जिवावर उदार होणार मग आह्मांला मागें काय करायचं! जिकडे आपण तिकडे आह्मीं. जी आपली वाट तीच आमची.

सदाशिवराव—तुमची इच्छा आमचे हत्तीचे शेजारींच तुमचे हत्ती असावेत असी आहे आणि आह्मींही

तसेंच ठरविलें आहे. मात्र प्रत्येकीनें आपल्या जवळ एक एक कट्यार ठेवावी. लढाईत आमचा अंत झाल्यास तुह्मीं आमच्या पश्चात् क्षणभरही राहूंनये. आणि शत्रूच्या हातीं सांपडून विटंबना करून घेऊं नये, हेंच योग्य.

पार्वतीबाई--आपली ही इच्छा ऐकून मला मोठा आनंद झाला आहे, आणि लक्ष्मीलाही त्याचप्रमाणें होईल. यावेळीं माझ्याच्यानें कांहीं जास्त बोलवत नाहीं.

सदाशिवराव—पुरे आतां, (चौघडा वाजतो.) हा पहा मध्यरात्रीचा चौघडा देखील झाला आतां थोडी विश्रांती मिळेल तर बरी. पहाटेस पुनःलवकर उठलें पाहिजे.

पार्वतीबाई—खरंच. आतां आपण पडावें.

(पडदा पडतो.)

प्रवेश ४

स्थळ--पानिपत. (सुजाउद्दौला आपल्या तंबूच्या बाहेर उभा आहे.)

सुजाउद्दौला—हे ब्राह्मण मुत्सद्दी ह्मणजे किती बेवकूब आहेत ! सदाशिवरावभाऊ मला पत्र पाठवितात त्यांत ते लिहीतात कीं "आतां अवधी राहिला नाहीं. पेला पूर्ण भरला. एक थेंबही राहवयाला जागा उरली नाहीं. काय तो जबाब कळवा. नाहींतर परिणाम वाईट होईल". अरे मूर्खा, परिणाम वाईट होईल हें मी जाणूनच आहें. पण तो कोणाचा, तो आम्हां मुसलमानांचा नसून, तुह्मां मराठ्यांचाच आहे. आमच्या अकलेनें तुह्मांला फंकून जाण्याला कोठें ही

जागा ठेविलीं नाहीं. तुमच्यापैकीं वृद्धवानर, म्हणजे तुमच्या घरचा धनगर मल्हारराव होळकर, याला मी आपलासा करून ठेविला आहे. आतां तुला जबाब काय द्यावयाचा. आह्मां धूर्त मुसलमानांनीं कधीं कोणाला सरळ आणि खरा जबाब दिला आहे काय ? शत्रूबरोबर दगा करून त्याचा नायनाटकरणें हेंच आमचें आदी कर्तव्य. त्याला अनुसरून तुमच्याकारितां आह्मीं केव्हांच खाडा तयार करून ठेविला आहे. आतां फक्त तुमचीं प्रेतें पडल्यानंतर त्यांत तुह्मांला मूठमाती देण्याचा अवकाश ! ज्यास्त वेळ न लावतां, आतांच्या आतां अहमदशहा अबदल्लीकडे जाऊन, त्याला या गुप्त मसलतीची सर्व हकीकत कळवून, पुढें काय व्यवस्था करावयाची ती सर्व आतांच ठरविली पाहिजे. मल्हारराव आमच्यावर हत्यार उचलणार नाहींत. ही तर माझी खात्रीच आहे. फक्त जर कांहीं थोडीशी धास्ती असेल तर जनकोजीशिंदे आणखी आमच्या जातींत उत्पन्न होऊन आमच्यावरतीच तोफेच्या गोळ्यानें आग उसळून देणार इब्राहिमखान गारदी या दोघांचीच आहे. तेव्हां आह्मांलाही आतां अशीच योजना केली पाहिजे. आणखी या दोघांचा पाडाव झाला ह्मणजे मग बाकीची सर्व मराठे मंडळी गारद करण्याला मुळींच वेळ लागणार नाहीं. या मूर्ख मराठ्यांनीं आपआपल्या बायकाही बरोबर आणल्या आहेत. त्यांसबंधीं माझा बेत निराळाच आहे. तो प्रसंगानुसार जसा पार पडेल तसा पाहून घेऊं. चला आतां अहमदशहा अबदल्लीला ही लढाईची वर्दी द्यावी. वेळ घालविण्यांत अर्थ नाहीं. (जातो.)

प्रवेश ५.

स्थळ---यमुना नदीचें अफाट मैदान.

(अहमदशहा अबदल्ली, व लुतुफखान दोघे बसले आहेत इतक्यांत सुजाउद्दौला येतो.)

अहमदशहा—क्यौं सुजाउद्दौलासहाब मेरेठोंके तरफकी हवाल कैसी है ?

सुजाउद्दौला—आल्म पनाह, दिन् निकलनेके पहिले दुष्मन् मेरेठे हम् लोगोंके उपर चढाई करनेवाले है. ऐसी खबर मिली है. और उसी मुऑफिक पेसवा भाऊसाहाबके तरफसे इह खलिता आया है. और इसमेभी इह लिखा है के, दिन् निकलनेके पहिले हम् तुम् लोगोंके उपर चढाई करनेवाले हय्, तो फिर हम् लोगोंनें बेशक हुषारिसे रहना चाहिये.

अहमदशहा—क्या कहतेहो? मरेठो हमारे उपर चढाई करके आता है? वाहवा! इह बात बहोतही उमदी है. लुतुफखान तुम्को इह फर्मान होता है के, रनखाममे नसदीक छावणी देके आपने सरदार अतईखान और दुंदिखान ठय् रहोये है, उनसे कहय्नाके अप्नी फौजकी तैयारी रखना और वखत् पडे इषारा होतेही हमसे आके मिलना.

(घोसमहमद येतो.)

अहमदशहा—(घोसमहमदाकडे पाहून) क्यँव घोसमहमद मराठेके तरफकी क्या हालत है ?

घोसमहमद—दुष्मन्, आपनी छावणी छोडके करनो-

लके तरफ भग्ता है. उसके पिछेसे हमारे लोग दोडते गयेथे. उस् वखत्को करनालके रस्तेमे अदमीयोंकी बहोतही भीड हुईथी. उन् लोगोंके उपर हल्ला करके सैयकडो लोगोंकी कत्ल् किई. और कहेक मिले हुवे मरगट्ठोंके कयेद करके लाये है. उनकी हालत क्या करना सो फरमान कीजिये. और इस् वखत्के चढाई मिलीहुई दौलत लूटके लाई है.

अहमदशहा—(सुजाउद्दौल्याकडे पाहून) नबाब सुजा-उद्दौलासाहाब मरगष्ठा तो करनोलके तरफ भगता है? फिर ये तुम् क्या कहते?

सुजाउद्दौला—(जरा गडबडून) सरकार, मुझे मिली हुई खबर आपको जाहीर किई है. इस् बाबमें जो कुछ मेरे तरफसे कसूर हुई होगी सो मुआफिक कि जीये. इतक्यांत बंदुकांचे आवाज होतात) सरकार, मैय् बयान करताहुं सो सुनलीजिये.

अघमदशहा—सुजाउद्दौलासाहाब, मुजको कुछभी समज हुवा नहीं. खैर दुष्मन् हमारे उपर चढाई करके आते है तो तय्यार रहो. और सब उन् दुष्मनोको गारद कर देव. हम् लढवय्ये मुसलमिनोंके आगे उनकी क्या कुवत् हय्. आय् खुदाताला हमारा मदतगार तूं ही हय्. बस्स अभी चलो. (जातात.)

प्रवेश. ६

स्थळ —पानिपतचें रणमैदान.

(जनकोजी शिंदे रक्तानें भरलेल्या कपड्यासह येतो)

जनकोजी— हाय! काय आजचा हा घोर प्रसंग !

त्यावेळची स्थिती किती अनुकूळ होती! दुराणी मागें परतला तेव्हां मराठ्यांना यश मिळालें असें वाटलें. इतक्यांत काय झालें कोणाला ठाऊक. पुन्हां दुराणीची लगट आमच्या वर झाली, हजारों मराठे कापले गेले. ज्या जानराव वावळयानें आणि धायबरानें मला कोटपुतळीस पोंहचविलें ते दोघेही वीर पडले. दुराणीशीं लढतां लढतां माझ्या अंगावर किती तरी जखमा झाल्या! देवा! मराठ्यांचा अंत बघूं नकोस. मराठे प्राण आहेत तोपर्यंत लढण्याला कमी करणार नाहींत. मधल्यामध्येंच निशाण खालींपाडून विश्वासरावाचा हत्ती खालीं कां बसविला कोणाला ठाऊक, हा विचार करतों आहे इतक्यांत, मस्तकावर तोफेचा गोळा येऊन पडावा त्याप्रमाणें विश्वासरावाच्या मृत्यूची वार्ता समजली! आतां त्या गोष्टीचा विचार करून काय उपयोग! अरे नीच अविंधानों, आजच्या प्रसंगीं, हा जनकोजी, यावेळीं जरी माझे सैनिक सैरावैरा झालें आहे तरी व्यूहांत सांपडलेल्या अभिमन्यु प्रमाणें भयंकर लढाई करील. आतां याच्यापुढें जितके शत्रू येतील तितक्यांचें तिळा तिळा एवढे तुकडे करून टाकील. आकाश पाताळ एक करून सोडी पानिपची रणभूमी रक्तमय करून टाकील. माझ्या बापाचा व चुलत्याचा जो तुह्मीं अपमान केला आहे त्याचा पुरा सूड घेईल. जरी मला पुष्कळ जखमा लागल्या आहेत, तरी अझून माझे दोन्हीं हात शाबूत आहेत. अझून मला हातांत समशेर धरण्याची ताकद आहे. माझ्या अंगांतून

जे रक्त निघून गेले आहे, त्यामुळें अतिउष्ण वाफा निघत आहेत; आणि त्या उष्णतेनें मला अधिक धीर येत चालला आहे. यवनांची शतशः प्रेतें पाडीन. अहमदशहा अबदलीचा मस्तक माझ्या रणशूर काकाच्या मस्तकाप्रमाणें या रणभूमीवर त्यांनीं तुडवून जसा अपमान केला त्याच्या शापटीनें अबदली तुझा मस्तक लाथेनें तुडवून मातीला मिळवीन. तुझ्या कवटीचे हाड सुद्धां कोणाला सांपडणार नाहीं. अशी स्थिती करून टाकीन. दगलबाज सुजाउद्दौल्या, अरे नजीब्या, तुह्मीं सर्व माझ्या पुढें पिशाच्च रूपानें दिसत आहा; तुमचा पिशाच्चें सुद्धां हा महामंत्री जनकोजी यापुढें जगाला त्रास देण्याकरितां ठेवणार नाहीं. माझ्या शरिरांत शिल्लक असलेले सर्व रक्त खवळून गेले आहे; अधण आलेल्या पाण्याप्रमाणें शरिरांतील सर्व शीरा तटातट तुटत आहेत. माझे पूर्वज स्वर्गातून मला आज्ञा करीत आहेत, जनकोजी मेलास तरी बेहेत्तर, तुला अक्षय्यी मुक्ती मिळेल. सुरांगना तुझ्या गळ्यांत माळा घालतील. पण अपयश संपादन करूं नकोस. सर्व ऐहिक सौख्याची आशा सोडून दे, आणि रणांमध्ये शत्रूच्या आहूती देऊन, आह्मां सन्निध ये स्वर्ग लोकींचे किन्नर, गंधर्व, तुझी किर्ती गातील आणि ध्रुवा प्रमाणें तूं अढळपदीं बसशील. बाबा, काका, तुह्मीं मला पूर्वीच्या प्रसंगीं जी आज्ञा केली त्याची स्मृती मला पूर्णपणें आहे. त्याचे कधीं विस्मरण होणार नाहीं. अरे अविंधानों, आतां हा सिंह खवळून गेला आहे. ब्रम्हांड

प्रळय करील. हजारो यवनांच्या आहुती रणयज्ञांत अर्पण करील. मना, आतां दुसरा कोणताही विचार करूं नको, मरणाची तयारी! दुसरी गोष्ट नाहीं. काय, ते समोरून कोण जात आहेत? यवनांची फौज मराठ्यांवर धावून चालली आहे (तरवार वर करून,) माझ्या हातांत तूं कोण आहेस? माझी खरी कुलदेवता! हे कुल देवते तुला माझे शतशः नमस्कार असोत, मराठ्यांचे धवल यश कायम ठेवणें, आतां तुजकडे आहे. माझं मस्तक या वेळीं भणाणून गेले आहे. रक्तपात! दुसरं काहीं सुचत नाहीं, या उपर हे कुलदैवते तुला जे कांहीं करणे असेल ते कर. पण या जनकोजीचा हा देह शत्रूच्या जिवंत स्वाधीन करूं नकोस. इतकंच तुझ्या जवळ माझें प्रेमपुरःसर मागणें आहे (इतक्यांत कांहीं मुसलमान जनकोजीवर हल्लाकरून, त्याला जखमी करून, धरून नेतात)

(पडद्याच्या दुसऱ्या बाजूनें सदाशिवराव येतो)

सदाशिवराव—दैव हे मनुष्याच्या स्वाधीन नाहीं! आकाश कोसळून पडेल! दशदिशा भयंकर राक्षसी प्रमाणें आपलें अक्राळ विक्राळ मुख उघडून मला गिळून टाकण्याला तयार झाल्या आहेत! बाळ विश्वासरायाचा मृत्यू ह्मणजे माझ्या मस्तकावरती वज्रपातच झाला आहे. आतां मला जगून काय करायंच आहे! हे काळं तोंड घेऊन पुण्यास जावायाचें ह्मणजे मृत्यू पेक्षांहि नीचतम आहे. बस्स झाला माझा निश्चय. ज्याच्या नशीबीं जसें असेल तसें होणार! सर्व कबिल्याची

आशा सोडून आतां हा सदाशीव यवनांच्या गर्दींत मिस-ळणार ! सांपडतील तितके अविंध कापून काढणार ! या रणक्षेत्राच्या भोंवताली जमलेले गृध्रादिक पक्ष्यांना यथेच्छ मांसाची मेजवानी करणार ! आणि हा क्षणभंगूर फुटक्या कवडीच्या किंमतीचा मृत्तिकामय देह त्यांच्या स्वाधीन करणार ! हे जगन्नियंत्या प्रभो हा मराठ्यावरतीं तूं काय प्रसंग आणलास ! माझ्या जिवाला जीव देणारे रणबहाद्दर बळवंतराव मेहेंदळे, गोविंदपंत बुंदेले, इब्राहिमखान गारदी आदी करून माझ्या सर्व वीरांचा पाडाव झाला! फक्त मराठ्यांची कीर्ती आणि यश संपादन करण्याकरितां आतां मी एकटाच जिवंत राहिलो आहे. बाह्यात्कारी गोड बोलून अंतर्यामीं कपट करणारा वृद्धकपी मल्हाररावहोळकर ऐन वेळीं दगाकरून रणभूमी सोडून पळून गेला. दमाजीगायकवाड, विठ्ठलशिवदेव विंचूरकर, यांनीं ही त्याच मार्गाचें अवलंबन केले!आतां मराठ्यांच्या बाजूनें लढून जय मिळविण्याला कोण उरला आहे ! फक्त ईश्वरा तूंच ! मला मोठे वाईट वाटते कीं आग्रहानें विश्वासरायाला मी बरोबर आणला, आणि आम्हां उभयतांचे कबिले ही आणले ही मोठी चूक झाली नारायणा ! आई कुलस्वामिनी पर्वती, माझ्या पश्चात् आह्मा मराठ्यांच्या स्त्रिया अविंधांच्या हातीं लागू देऊ नकोस. त्यांचे प्राणवायू तूं एकदम आकर्षण करून टाक आतां मला कांहीं एक भान राहिलें नाहीं. हे मृत्यो, लवकर तूं मला आपल्या स्वाधीन करून घे. यशाची आशा मुळीच राहिली नाहीं.

सर्वथैव बुडालो! मरणाचें दुःख मुळींच वाटत नाहीं, पण अपयशाचा डाग मी कपाळीं लावून घेतला ! जोंपर्यंत जगामध्यें हिंदूची जात अवशेष आहे, तोंपर्यंत ते सर्व मला अपयशाचा पुतळा ह्मणून ह्मणतील ! आणि यामुळें स्वर्ग लोकीं सुद्धां मला सुख होणार नाहीं ! पण मला आतां असें वाटतें कीं वृद्ध मुत्सद्दी सुरजमल्लजाट आणि मल्हारराव होळकर माझे हित शत्रू नव्हतें. पण मला भूरळ पडली त्यांची सल्ला मी ऐकिली नाहीं. हा चांडाळ केवळ माझा शत्रू माझ्या बायकोचा सख्खा भाऊ बळवंतराव मेहेंदळे, या अधमामुळें मीं सर्वथैव फसलो आणि महाप्रतापी माझ्या पूर्वजांच्या यशाला काळोखी आणली ! देवा ! आतां मला लवकर मृत्यू दे पण माझ्या हातून माझ्या शत्रूचें कंदन करीव. आतां मी दुसरे कांहीं एक मागत नाहीं.

[इतक्यांत कांहीं मुसलमान दीन् दीन् करीत येऊन सदाशिवरावास वेढतात. पडदा पडतो].

समाप्त.